दैनिक
# ग्लोबल भारत
वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं
www.globalbharatlive.com
◆ औरंगाबाद ◆ वर्ष ५ वे ◆ अंक २१५ वा ◆ पाने ८ ◆ मुल्य ५ रु
dailyglobalbharat@gmail.com रविवार दि.०४ मे २०२५ संपादक – शरद खेमचंद अडागळे

# गोव्यातील प्रसिद्ध लईराई देवीच्या जत्रेत चेंगराचेंगरी; ७ जणांचा मृत्यू, ३० जखमी

पणजी दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– गोव्यातील शिरगाव येथील प्रसिद्ध लईराई देवीच्या जत्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ७ भाविकांचा मृत्यू झाला, तर ३० हून अधिक जखमी झाले आहेत. शुक्रवारपासून लईराई देवीच्या यात्रेला सुरूवात झाली असून दुसऱ्या दिवशी म्हणजे आज (दि. ३) पहाटे यात्रेला गालबोट लागले.



गोव्यातील शिरगाव या ठिकाणी शुक्रवारी रात्री उशिरा श्री लैराई देवीच्या यात्रेसाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी अचानक चेंगराचेंगरी झाली आणि मोठा गोंधळ उडाला. यामध्ये ६ भाविकांचा मृत्यू झाला आहे. तसेच जखमींना गोवा येथील वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) आणि म्हापसा येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर (ट्विटर) दिलं आहे.

दरम्यान, लैराई देवीची यात्रा हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. राज्यभरातून आणि परदेशातून देखील भाविक लैराई देवी च्या यात्रेसाठी येत असतात. या उत्सवात भव्य मिरवणूक काढली जाते. मात्र, या वर्षी या यात्रेदरम्यान चेंगराचेंगरीची दुर्दैवी घटना घडली आणि या घटनेत ६ भाविकांचा मृत्यू झाला आहे.

"शिरगाव येथील श्री लैराई देवीच्या यात्रोत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेबाबत आम्ही दुःख व्यक्त करतो. या घटनेत ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावलं त्यांच्या कुटुंबियांप्रति आम्ही मनापासून संवेदना व्यक्त करतो. तसेच या घटनेत जखमी झालेले भाविक लवकरात लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना करतो", असं गोवा काँग्रेसने एक्सवर (ट्विटर) केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

दरम्यान, शिरगाव येथील श्री लैराई देवीच्या यात्रोत्सवात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेबाबत अद्याप स्थानिक प्रशासनाकडून अधिकृतपणे दुजोरा देण्यात आलेला नाही. तसेच चेंगराचेंगरीची घटना कशामुळे घडली? यामागचं कारण काय? याबाबत अद्याप कोणतीही माहिती प्रशासनाकडून अधिकृतपणे देण्यात आलेली नाही. मात्र, प्राथमिक माहितीनुसार अचानक मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्यामुळे ही घटना घडल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## मुख्यमंत्री सावंत यांच्याकडून उच्चस्तरीय चौकशीचे आदेश

गोव्यातील शिरगाव येथील प्रसिद्ध लईराई देवीच्या जत्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ७ भाविकांचा मृत्यू झाला, तर ३० हून अधिक जखमी झाले आहेत. शुक्रवारपासून लईराई देवीच्या यात्रेला सुरूवात झाली असून दुसऱ्या दिवशी म्हणजे आज (दि. ३) पहाटे यात्रेला गालबोट लागले. दरम्यान, आज सकाळी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी घटनास्थळाची पाहणी करून शोक व्यक्त केला.

अशा प्रकारची घटना अतिशय दुर्दैवी असून असा प्रकार कधीच घडलेला नाही. त्यामुळे सर्वांनाच धक्का बसला असून शोक झालेला आहे. या दुर्दैवी घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मृतांच्या नातेवाईकांच्या प्रति आमच्या संवेदना आहेत. तसेच कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात येणार आहे. जखमींवर तातडीने उपचार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सर्व प्रकारचे सहकार्य सरकारतर्फे पुरविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी यावेळी सांगितले.

घटनास्थळाची जागा अतिशय अरुंद आहे. दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणात दुकाने थाटलेली आहेत. तसेच उतरती व चढावामुळे या ठिकाणी लोकांची गैरसोय होत आहे. यापुढे या ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सुचना मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी पोलीस अधीक्षक अक्षत कौशल, उपाधीक्षक जिवबा दळवी, गडेकर, देवस्थानचे अध्यक्ष दीनानाथ गावकर व पदाधिकारी आदी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष दीनानाथ गावकर म्हणाले की, पहाटे धोंडाच्या दोन गटांमध्ये काहीतरी घडले. त्यातच मोठी गर्दी असल्याने काही लोक खाली पडले. त्यानंतर झालेली चेंगराचेंगरी तसेच एका दुकानांमध्ये अचानक विजेचा शॉक लागल्याने गोंधळ उडूव चेंगराचेंगरी झाली. त्यात ६ जणांचा मृत्यू झाला. तर अनेक जण जखमी झाले. हजारो भाविक असल्याने शिस्तीचे पालन करणे गरजेचे आहे. या घटनेबद्दल आम्हाला तीव्र दुःख झाले असून मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, यासाठी आम्ही अधिक कडकपणे उपाययोजना आखण्याच्या दृष्टीने तयारी करू, असेही गावकर यांनी सांगितले.

प्रशासनाची कोणतीही चूक नाही, गोवा सरकार व प्रशासनाने तसेच पोलीस व इतर संघटनांनी आम्हाला पूर्ण सहकार्य केले आहे. जत्रोत्सवात शिस्तीचे पालन केलेले होते. मात्र, पहाटे घडलेली घटना ही अतिशय दुर्दैवी आहे, असे गावकर यांनी सांगितले.

# नराधम दत्ता गाडेचा फोन अश्लील व्हिडीओंनी भरलेला

## वर्षात २२ हजार व्हिडीओ पाहिले, गुगल हिस्ट्रीतून माहिती समोर

पुणे दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– स्वारगेट अत्याचार प्रकरणातील नराधम दत्ता गाडे याच्यासंबंधी एक मोठी माहिती समोर आली आहे. दत्ता गाडेने एका वर्षात एक दोन नव्हे तर तब्बल २२ हजार अश्लील व्हिडीओ पाहिल्याचं त्याच्या गुगल हिस्ट्रीतून स्पष्ट झालं आहे. दत्ता गाडेच्या मोबाईल फोनमधील गुगल सर्च हिस्ट्री सायबर पोलिसांनी तपासली असता ही माहिती समोर आली. त्यामुळे दत्ता गाडेची विकृत मानसिकता समोर आली आहे.

स्वारगेट आगारात शिवशाही बसमध्ये २५ फेब्रुवारी रोजी एका पीडितेला फसवून तिच्यावर अत्याचार करण्यात आला होता. (पान ४ वर)

# दहशतवादी आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांविरुद्ध आता ठोस आणि निर्णायक कारवाई–पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– दहशतवाद हा मानवतेसाठी धोका आहे. त्यामुळे दहशतवाद आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांविरुद्ध ठोस आणि निर्णायक कारवाई करू, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी पुन्हा एकदा पाकिस्तानला ठणकावले. हैदराबाद हाऊस येथे अंगोलाचे अध्यक्ष लॉरेन्को यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय



बैठकीनंतर पंतप्रधान मोदी पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत बोलत होते.

अंगोलाचे राष्ट्रपती ३८ वर्षांनी भारत दौऱ्यावर आले आहेत, हा एक ऐतिहासिक क्षण आहे. त्यांच्या या भेटीमुळे भारत–अंगोला संबंधांना नवी दिशा मिळत आहेच, शिवाय भारत–आफ्रिका भागीदारीही बळकट होत असल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले. यावर्षी भारत आणि अंगोला राजनैतिक संबंधांचा ४० वा वर्धापन दिन साजरा करत आहेत. पण आमचे नाते त्यापेक्षा खूप जुने आहे. जेव्हा अंगोला स्वातंत्र्यासाठी लढत होता, तेव्हा भारतही पूर्ण विश्वासाने आणि मैत्रीने उभा राहिल्याचे मोदींनी सांगितले. अंगोलाच्या सैन्याच्या आधुनिकीकरणाला पाठिंबा देण्यासाठी (पान ४ वर)

# मलाही मुख्यमंत्री व्हावं वाटतं, पण योग येईना–अजित पवार

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– राज्यात महिला मुख्यमंत्री व्हावी असे सर्वांना वाटते. पण ते अद्याप शक्य झालेले नाही. त्यानुसार कित्येक वर्षे मलाही मुख्यमंत्री व्हावे वाटत आहे. पण तो योग कुठेही जुळून आलेला नाही, अशी खंत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली. वरळी येथे आयोजित केलेल्या महिला सन्मान सोहळ्यात ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात महिलांना संधी मिळाली पाहिजे. त्यांच्यावर अन्याय होता कामा नये. महायुती सरकारने लाडक्या बहिणींसाठी चांगला निर्णय घेतला आहे. त्यांच्या कुटुंबांना आधार देण्याचे काम सरकारने केले आहे. अनेक महिलांचे कर्तृत्व राज्याने पाहिले आहे. राजकारणात वैचारिक मतभेद असावेत, पण मनभेद होता कामा नये. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचेही यावेळी भाषण झाले. ते म्हणाले, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या महिलांना सन्मानित करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. तुमच्या पुरस्काराने आमच्या कार्यक्रमाची उंची वाढवली आहे. तुम्ही महाराष्ट्राचे नाव आणि मराठी संस्कृतीची जगभरात ओळख निर्माण केली आहे.

# अजित पवार– शिंदे मुख्यमंत्री होणार नाहीत; संजय राऊत कडाडले

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– अजित पवार मुख्यमंत्री होतील हा योग कधी येईल? असा प्रश्न उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री पदाबाबत आशा व्यक्त केली होती. यावरुन राऊत यांनी त्यांच्यावर निशाणा साधला.



या संबंधीत प्रसार माध्यमांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, मी नेहमी म्हणतो की, छगन भुजबळ जर शिवसेनेमध्ये आणखी काळी राहिले असते तर मुख्यमंत्री झाले असते. नारायण राणे अजून काही काळ शिवसेनेत राहिले असते तर ते शिवसेनेतून पुन्हा मुख्यमंत्री झाले असते. मनोहर जोशी झाले ना! ते पक्षाबरोबर निष्ठेने राहिले त्यामुळे मुख्यमंत्री झाले. मात्र, एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होणार नाहीत आणि अजित पवार देखील जोपर्यंत भारतीय जनता पक्षासोबत आहेत तोपर्यंत मुख्यमंत्री होणार नाहीत. जर हे दोन्ही पक्ष भाजपमध्ये विलीन झाले तर ते कदाचित भारतीय जनता पक्षाचे मुख्यमंत्री होतील. हे त्यांना अमित शहा यांनी देखील सांगितले आहे. हे आधीच मी दैनिक सामनामध्ये लिहिले देखील असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा गट जर भाजपमध्ये विलीन झाला. तर सिद्धरमय्या यासारखे ते भाजपचे एक मुख्यमंत्री होऊ शकता. तसे झाले तरच एकनाथ शिंदे किंवा अजित पवार हे मुख्यमंत्री होऊ शकतात, हे मी आधीच सांगितलं आहे, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.

अमित शहा महाराष्ट्रातील पक्ष चालवतात. यात एक भारतीय जनता पक्ष, दुसरा शिंदे यांचा जो पक्ष आहे तो आणि तिसरा अजित पवार यांचा पक्ष देखील अमित शहांचा पक्ष आहे. जे महाराष्ट्राचे शत्रू आहेत, त्या अमित शहांच्या पक्षाकडून (पान ४ वर)

# भिवंडीत आढळले एकाच कुटूंबातील चौघांचे मृतदेह, मृतांमध्ये आईसह तीन मुलींचा समावेश

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– भिवंडी येथील फेणे गावात शनिवारी सकाळी एका घरात एक महिला आणि तिच्या तीन मुली अशा चौघांचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. या महिलेचा पती सकाळी कामावरून घरी परतला, त्यावेळी हा प्रकार उघडकीस आला. या चौघांचे मृतदेह स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत. या महिलेने आत्महत्या करीत असल्याचे मृत्युपुर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत म्हटले असले तरी त्यामागचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. भिवंडी येथील फेणे गावातील एका चाळीत लालजी बनवारीलाला भारती हे आपल्या कुटूंबासोबत राहतात. त्यांचा पत्नी पुनीता (३२) आणि मुलगी नंदिनी (१२), नेहा (७) आणि अनु (४) असा परिवार होता. लालजी भारती हे यंत्रमाग कामगार असून शहरातील एका यंत्रमाग कारखान्यात काम करतात. लालजी हे शुक्रवारी रात्री कारखान्यात कामावर गेले होते. त्याच्या घरी पत्नी आणि तीन मुली होत्या. लालजी हे सकाळी कामावरून घरी परतले. त्यांनी घराचा दरवाजा ठोकला पण, पत्नी किंवा मुलींनी दार उघडले नाही. यामुळे त्यांनी घराची खिडकी उघडली आणि यात डोकावून (पान ४ वर)

# पहेलगाम हल्ल्यात सहभागी असलेले मानवतेचे शत्रू असून ते नरकात कुजतील–फारुख अब्दुल्ला

श्रीनगर दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)–जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, संपूर्ण देशात संतापाची लाट आहे. यातच माजी मुख्यमंत्री तथा जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सचे (जेकेएनसी) अध्यक्ष फारुख अब्दुल्ला यांनी, या हल्ल्याचा निषेध केला असून लोकांना दहशतवादाविरुद्ध एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. तसेच, हल्ल्यात सहभागी असलेले मानवतेचे शत्रू असून ते नरकात कुजतील, असेही फारुख अब्दुल्ला म्हणाले. यावेळी त्यांनी सिंधू पाणी करारावरही भाष्य केले.

फारुख अब्दुल्ला पहलगाम हल्ल्यात मृत्यू झालेल्या आदिल हुसेन शाहच्या घरी पोहोचले. येथे त्यांनी आदिलच्या कुटुंबाची भेट घेतली आणि त्याला श्रद्धांजली वाहिली. आदिल पोनी राईड ऑपरेटर म्हणून काम करत होता. दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या २६ जणांमध्ये आदिलचाही समावेश होता. आदिल वगळता सर्वजण पर्यटक होते. फारुख म्हणाले, आदिल एक शहीद आहे. तो दहशतवाद्यांना घाबरून पळून गेला नाही. तो त्यांच्याशी धैर्याने लढला. हीच तर मानवता आणि काश्मिरीयत आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर, भारताकडून पाकिस्तानविरुद्ध केल्या जात असलेल्या कारवाईसंदर्भात बोलताना फारुख अब्दुल्ला म्हणाले, "यासंदर्भात आपण काहीही बोलणार नही. कारण हा पंतप्रधानांचा अधिकार आहे." मात्र यावेळी त्यांनी पाकिस्तानला फटकारले. "पाकिस्तान पीपल्स पार्टीचे नेते बिलावल भुट्टो झरदारी यांच्या धमक्यांवर प्रतिक्रिया देताना फारुख म्हणाले, अशा नेत्यांच्या वक्तव्यांमुळे हा प्रश्न सुटणार नाही. जर आपण त्याच्या विधानांकडे (पान ४ वर)

# संपूर्ण महाराष्ट्राला अवकाळी पुन्हा झोडपणार

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– सध्या पश्चिमी चक्रावताच्या प्रभावामुळे हिमाचल प्रदेश उत्तराखंड, दिल्ली अशा उत्तरेकडील राज्यांमध्ये तुफान पाऊस सुरू आहे . तर दक्षिणेकडील राज्यांमध्येही वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे . महाराष्ट्रात तापमानाचा पारा प्रचंड वाढला असून आता येत्या चार दिवसात कोकणपट्ट्यासह मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात अवकाळी पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. दरम्यान आज संपूर्ण महाराष्ट्रात सामान्य तापमान होऊन अधिक तापमानाची नोंद झाली. राज्यभरात आता प्रचंड रखरख वाढली आहे .उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत.

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार सध्या चक्राकार वाऱ्यांची स्थिती राजस्थान सह मध्य प्रदेश व खालपर्यंत सक्रिय असल्याने महाराष्ट्रात पुढील पाच दिवस अवकाळी पाऊस हजेरी लावणार आहे . ३–४ व ५ मे रोजी विदर्भासह मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना पावसाचे इशारे आहेत . त्यानंतर उत्तर महाराष्ट्र मध्य महाराष्ट्र तसेच मराठवाड्यातील काही जिल्हांमध्ये अवकाळी पाऊस येणार आहे . गेल्या आठवडाभरापासून विदर्भातील काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला होता .

राज्यात बहुतांश ठिकाणी तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे .आजपासून ( ३ एप्रिल ) पुढील पाच दिवस बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता आहे .अवकाळी पावसाची शक्यता असली तरी तापमानाचा पारा ४० च्या पुढेच असल्याची नोंद होत आहे . प्रचंड उकाडा वाढला आहे. (पान ४ वर)

# 'एआय'च्या वापरामुळे नवउद्योगाला उज्ज्वल भविष्य

## 'भारतीय उद्योजकतेचे भवितव्य एक दृष्टिक्षेप' चर्चासत्रातील सूर

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– भारतात स्टार्टअप्सची संख्या झपाट्याने वाढत आहे. प्रामुख्याने आयटी, फिनटेक, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात नव्या संधी निर्माण होत आहेत. राज्य शासनाकडून स्टार्टअप इंडियाच्या माध्यमातून विविध योजनांमुळे तरुण उद्योजकांना मोठा आधार मिळत असल्याने नवउद्योजकांना उद्योगात उज्ज्वल भवितव्य आहे. आधुनिकतेचा स्वीकार करून 'एआय'चा (कृत्रिम बुद्धिमत्ता) वापर स्वीकारावा लागणार असल्याचा सूर 'भारतीय उद्योजकतेचे भवितव्य–एक दृष्टिक्षेप' चर्चासत्रातून उमटला.

बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन परिषदेमध्ये 'भारतीय उद्योजकतेचे भवितव्य–एक दृष्टिक्षेप' चर्चासत्र पार पडले. चर्चासत्रात 'बोट' लाइफस्टाइलचे सहसंस्थापक अमन गुप्ता, शादी डॉट.कॉमचे अनुपम मित्तल यांनी भाग घेतला, उद्योजक




श्री. खुराणा यांनी मुलाखत घेतली.

गुप्ता म्हणाले की, सध्या कोणताही छोटा मोठा व्यवसाय करा, त्यामध्ये 'एआय'चा वापर हा राहणार आहे, यामुळे गुंतवणूकदारांनी अशा उद्योगात पैसे गुंतवायला हवेत. आपल्या व्यवसायामध्ये गुंतवणूकदारांसाठी काही समस्या असतात, मात्र व्यवसाय आणि पैसा मिळवण्यासाठी गुंतवणूकदार हवेतच. पूर्वी शासकीय नोकरीला प्राधान्य होते, मात्र सध्या स्टार्टअपला प्राधान्य आहे. सुरुवातीला स्टार्टअपमध्ये काही आव्हानांना सामोरे जावे लागेल. मात्र कधीतरी आपल्याला नफा मिळणार असल्याने कष्ट करण्याच्या मानसिकतेवर भर (पान ४ वर)

# केंद्र सरकारकडून पाकिस्तानातून होणारी आयात बंद

## पाकच्या अर्थव्यवस्थेला तगडा झटका बसणार

नवी दिल्ली दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– पहलगाममध्ये झालेल्या पर्यटकांवरील क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून कडक कारवाईसाठी पडद्यामागून तयारी सुरु असली, तरी तत्पूर्वी पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी सुरुच ठेवली आहे. दोन्ही देशांमधील तणाव वाढत असल्याने भारताने पाकिस्तानमधून येणाऱ्या सर्व वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने २ मे रोजी एका सूचनेत म्हटले आहे की ही बंदी तत्काळ लागू होईल. भारत सरकारने परराष्ट्र व्यापार धोरण, २०२३ मध्ये एक नवीन परिच्छेद २.२० अ समाविष्ट केला आहे, ज्यामध्ये पाकिस्तानमधून आयात करण्यावर बंदी असे म्हटले आहे. सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूक, मुक्तपणे आयात करता येण्याजोगी असो वा नसो, पुढील आदेशापर्यंत तत्काळ प्रभावाने प्रतिबंधित करण्यात आली आहे. या निर्बंधातील कोणत्याही अपवादासाठी भारत सरकारची पूर्व परवानगी आवश्यक असेल, असे डीजीएफटीने आपल्या अधिसूचनेत म्हटले आहे.

व्यापार बंदीमुळे पाकिस्तानच्या निर्यात क्षेत्राला दणका बसणार आहे. ज्यामध्ये सिमेंट, कापड आणि कृषी उत्पादनांसारख्या वस्तूंसाठी सीमापार व्यापारावर अवलंबून आहे. औपचारिक व्यापार आधीच मर्यादित असल्याने, या हालचालीमुळे (पान ४ वर)

# पहलगाम : भ्याड दहशतवादी हल्ला !

'किसी मुल्क को बर्बाद करना हो तो लोगो को धर्म के नाम पर लढा दिजिए, मुल्क अपने आप बर्बाद हो जायेगा' – लियो टॉलस्टाय यांचे उद्गार आज खरे ठरत आहेत. २२ एप्रिल २०२५ रोजी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष बेन्स हे भारतात होते, पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात होते. भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरमध्ये देशाच्या विविध भागातून आलेले हजारो पर्यटक निसर्ग सौंदर्याचा मनसोक्त आनंद लुटत होते. काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला पर्यटन व्यवसाय बहरत असतांना दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २८ हिंदू पर्यटकांना समोरून गोळ्या घातल्या. त्याची प्रतिक्रिया म्हणून देशात संतापाची लाट उसळणे नैसर्गिक होते. या वेळी समस्त विरोधी पक्षांनी सरकारला दिलेला एकमुखी पाठिंबा आणि विविध मुस्लीम संघटनांनी दिलेला संयमी आणि संवेदनशील प्रतिसाद हे सरकारसाठी जमेचे मुद्दे आहेत. पुलवामाप्रमाणेच या वेळीही सुरक्षा यंत्रणेबाबत काही गंभीर शंका आहेत.

पहलगाम हे पर्यटकांचे मोठे आकर्षण स्थळ आहे. सर्व देशातून काश्मीरमध्ये येणारे पर्यटक श्रीनगर, गुलमर्ग आणि पहलगाम येथे हमखास येतात, पहलगाम हे भारत–पाकिस्तान सरहद्दपासून बरेच दूर आहे. सरहद्दीपासून पहलगामला पोहोचायला ८ तास तरी लागतातच. अशा दूर अंतरावर पाकिस्तानमधून आलेले प्रशिक्षित व सशस्त्र दहशतवादी पोहोचले तरी कसे? हे गूढ अजून उकललेले नाही. किश्तबाडमधून त्रालच्या दाट जंगलातून हे पायपीट करुन आले असण्याची शक्यता आहे. पण ते पहलगामला पोहोचून तेथे २८ हिंदू पर्यटकांचे रक्ताचे सडे उडवेपर्यंत जम्मू–काश्मीर पोलीस, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव सुरक्षा दल, निमलष्करी दले आणि लष्करी सैन्यदलाला सुद्धा त्याचा चांगपत्ता लागला नाही, याचे मोठे आश्चर्य वाटते. जम्मू काश्मीर हा देशातील सर्वांत मोठा संवेदनशील व हाय सिक्युरिटी झोन आहे. पाकिस्तानच्या सरहद्दीला लागून हे राज्य आहे. २४ तास डोळ्यांत तेल घालून तेथे घडणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते, मग यावेळी आपण कमी कुठे पडलो?

सुमारे दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षा रक्षक नसणे, गुप्तचर यंत्रणेला सुगावा न लागणे याची जबाबदारी कोणाची? काश्मीरचे स्थित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन खोऱ्यात निरपराध व निष्पाप पर्यटकांच्या हत्याकांडाने रक्ताचा सडा पडला. त्या दिवशी बेसरनमध्ये येऊन कुणी घोडेस्वारीचा आनंद घेत होते तर कुणी खाण्यापिण्यात मस्त दंग होते, मुले खेळत होते, मस्ती करत होते, कुणी फोटो काढत होते, तर कोणी व्हीडिओ शूटिंगमध्ये निसर्गाचे सौंदर्य टिपत होते. अचानक गोळीबाराचे आवाज आले, पोलिसांच्या गणवेषात काही धावतांना दिसले, पोलिसांबरोबर कुणाची तरी चकमक चालू आहे असे पर्यटकांना क्षणभर वाटले पण ने तरुण दहशतवादी हातात बंदूक घेऊन प्रत्येकाला नाव विचारावला लागले, तू हिंदू का मुस्लीम असा प्रश्न थेट विचारू लागले, कलाम पढायला सांगू लागले आणि एकापाठोपाठ एक अशा हिंदू पर्यटकांना डोक्यावर, छातीवर गोळ्या घालून ठार मारू लागले. पत्नी आणि मुलांसमोर त्यांनी पुरुष पर्यटकांवर गोळ्यांचा वर्षाय केला. एवढा मोठा रक्तपात काश्मीर खोऱ्यात कित्येक वर्षांत घडला नव्हता.

त्या दिवशी पहलगाम परिसरात २५०० पर्यटक होते, बेसरनच्या पठारावर मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ, गुजराती असे विविध भाषिक पर्यटक जमले होते. दहशतवाद्यांनी कुणालाही त्यांची जात, त्यांचा प्रांत किंवा त्यांची भाषा कोणती असा प्रश्न विचारला नाही, तर ते कोणत्या धर्माचे आहेत एवढाच प्रश्न विचारत होते, काहींनी पर्यटकांकडे आधारकार्ड व ड्रायव्हिंग लायसन्सची मागणी केली, ज्या पर्यटकांविषयी संशय आला त्यांच्या अंगावरची पेंट काढून खतना तपासला. खतना न केलेल्यांना त्यांनी जवळून गोळी घातली, जे गप्प बसले, तेही रक्ताच्या थारोळ्यात पडले. पहलगाममध्ये २५०० पर्यटक असतांना ज्या बेसरनमध्ये हत्याकांड घडले त्याच्या जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नव्हती, कुठेही पोलीस चौकी नव्हती, कुठेही गस्त नव्हती. दहशतवाद्यांना रोखायला कोणतीच सुरक्षा यंत्रणा नसावी हे असे कसे घडू शकते? विशेष म्हणजे गोळीबार झाल्यावर व २८ पर्यटकांची हत्या झाल्यावर दहशतवादी तिथेच काही काळ होते पण सुरक्षा व्यवस्थेला काही कळू शकले नाही, हे चिंताजनक आहे. दहशतवादी निश्चितच हत्याकांड घडविण्यापूर्वी अगोदर आलेले असणार, ते काही बंदुका हातात येऊन जंगलात फिरत बसणार नाहीत, मग ते कुठे राहिले, कुठे जेवले, त्यांना मदत करणारे स्थानिक कोण आहेत? घटनेनंतर पाच दिवस उलटले तरी त्याचा तपशील बाहेर आला नाही. पाकिस्तानच्या सीमेवरून दहशतवादी घुसले तेव्हा आपले सुरक्षा दल कुठे कुठे होते? दहशतवादी हे पोलिसांच्या किंवा लष्करी सैनिकांच्या गणवेषात पहलगामला आले होते, त्यांना सुरक्षा दलाचे गणवेष कुणी पुरवले? ते त्यांनी कुठे अंगावर घातले? अंगावरचे कपडे कुठे बदलले व कुठे लपवून ठेवले?

मोदी सरकारच्या दोन कारकिर्दीत पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने सर्व देशाचा धरकाप उडला होता. दहशतवादी देशात कसे घुसले? तिथपर्यंत कसे पोहोचले, सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या बसपर्यंत ते कसे पोहोचू शकले? साडेचारशे किलो आरडीएक्स हाय सिक्युरिटी झोनमध्ये कसे येऊ शकले? सुरक्षा दलाचे जवान विमानाने न जाता बसेसमधून प्रवास करीत आहेत ही माहिती दहशतवाद्यांपर्यंत कशी पोहोचली? पुलवामा हल्ला करणारे दहशतवादी कोण आहेत, कुठे आहेत? पुलवामाचा बदला म्हणून भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये पुसून बालाकोटला एअर स्ट्राईक करून दहशतवाद्यांचे असंख्य अड्डे उद्ध्वस्त केले असे सांगितले गेले, मग त्यानंतरही काश्मीरवर दहशतवादी हल्ले कसे चालू राहिले? तेव्हा ४४ सुरक्षा दलाच्या सैनिकांची हत्या झाल्यावर इंटेलिजन्सचे अपयश म्हणून आरोप झाले, आता पहलगाम पर्यटकांच्या हत्याकांडानंतरही इंटेलिजन्सवर खापर फोडले जात आहे. पुलवामा हत्याकांडानंतर जम्मू–काश्मीरचे तत्कालीन उपराज्यपाल सतपाल मलिक यांनी त्या घटनेबाचत सरकारला दोष दिला होता. सरकारने दुर्लक्ष केले, असे म्हटले होते. पण त्या घटनेला कोण जबाबदार आहे हे कधी समजलेच नाही.

पहलगाम हत्याकांडाची जबाबदारी पाकिस्तान स्थित लष्कर–ए–तोयबाशी संलग्न असलेल्या द रेजिस्टेंस फ्रंट ने घेतली होती ती नंतर घुमजाव करून झटकली. दहशतवादी दक्षिण काश्मीरमधील कोकेरनाग येथून किश्तवाड मार्गे बेसरनला पोहोचले. बर्फाच्छादीत पर्वतांनी वेढलेल्या बेसरनच्या पठारावर दहशतवादी दुपारी ३ वाजता पोहोचले तेव्हा देशाच्या विविध भागांतून आलेले पर्यटक त्यांच्या मित्रमंडळी व परिवारासह मौज–मजा मस्तीत आनंद लुटत होते. आपल्याला कोणी प्रतिकार करणारे नाही, पर्यटक निःशस्त्र आहेत. जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नाही. हे दहशतवाद्यांना पूर्ण ठाऊक असावे. बेसरनपासून ५ किमी अंतरावर सीआरपीएफचा कॅम्प आहे, पण त्याची सुद्धा दहशतवाद्यांना पर्वा नव्हती.

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २०० निरपराध मुंबईकरांचा बळी गेला. मुंबई पोलीस दलातील धाडसी व आक्रमक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनाही दहशतवाद्यांशी लढतांना मरण आले, पण मुंबई सर्व दहशतवादी पोलिसांनी आलेले सर्व दहशतवादी वेचून–वेचून ठार मारले. एवढेच नव्हे तर अजमल कसाबला पोलिसांनी जिवंत पकडला व पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा सर्व जगाला दाखवला, त्याच कसाबला नंतर फाशी झाली. संसदेवर दहशतवादी हल्ला झाला तेव्हाही सर्व दहशतवादी संसदेच्या प्रांगणातच ठार मारले गेले. मुंबईवरील आणि संसदेवरील हल्ल्यात दहशतवादी हे लष्करी गणवेषात होते. तसेच पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यातही दहशतवादी लष्करी गणवेषात होते. दुर्दैवाने पुलवामा येथील हल्ल्यात पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा म्हणून कोणाला पकडून जगाला दाखवता आलेला नाही. पहलगाम येथे हत्याकांड घडविणारे दहशतवादी कसे–कुठे पसार झाले ते अजून समजलेले नाही.

गेली सहा दशके जम्मू काश्मीरला घटनेतील ३७० कलमानुसार विशेष दर्जा होता. जम्मू–काश्मीरचा झेंडा सुध्दा वेगळा होता. केंद्राने केलेले कायदे काश्मीरच्या विधानसभेने मंजूर केल्यावर तिथे लागू होत असत. काश्मीरमध्ये हिंदुस्थानातील कोणात्याही व्यक्तीला मालमत्ता खरेदी करता येत नव्हते. मोदी सरकारने ३७० वे कलमच काढून घेतले, त्यावर संसदेने शिक्कामोर्तब ही केले. जम्मू–काश्मीरचे विभाजन करून लेह–लद्दाख वेगळा केला. काश्मीर हा केंद्रशासित प्रदेश केला. काश्मीरला विधानसभा दिली, पण पूर्ण दर्जा अजून मिळालेला नाही. मुख्यमंत्र्यापेक्षा जास्त अधिकार तेथील उपराज्यपाल यांना आहेत. पण अशा मुद्दयावरून काश्मीरमध्ये असंतोष व अशांतता कशी निर्माण होईल यासाठी पाकिस्तान सतत प्रयत्न करीत असतो. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर हे भारताच्या विरोधात नेहमीच गरळ ओकण्याचे काम करीत असतात.

१६ एप्रिल २०२५ रोजी इस्लामाबाद येथे एका परिषदेत ते म्हणाले, काश्मीर ही पाकिस्तानच्या गळ्यातील नस आहे, ती कधीही विसरली जाणार नाही. काश्मिरी बांधवांना त्यांच्या शौर्यपूर्ण संघर्षात एकटे सोडणार नाही पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ म्हणाले, भारताने पाकिस्तान शहरात घुसून कारवाई केल्यास त्याची किमत भारताला मोजावी लागेल. जर पाकिस्तानी नागरीकांना काही इजा झाली, तर भारतीय नागरीक सुरक्षित राहणार नाहीत. पहलगाममध्ये निरपराध २८ हिंदू पर्यटकांच्या भीषण हत्याकांडानंतर भारताने गप्प बसून सहन करावे असे पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांना वाटते काय? पहलगाम हत्याकांडानंतर त्याच्याशी आमचा काही संबंध नाही, हल्ला करणारे स्वातंत्र्य सैनिक असू शकतात अशी प्रतिक्रिया पाकिस्तानने व्यक्त केली होती म्हणूनच अजमल कसाबसारखा दहशतवादी चेहरा जिवंत पुरावा म्हणून भारताला, जगाला पुन्हा एक्दा दाखवावा लागेल पहलगामची घटना म्हणजे पाकिस्तानकडून भारतावर हमाससारखा झालेला हल्ला आहे. आता भारत सरकार इस्रायलप्रमाणे सडेतोड उत्तर देणार, याची सारे जग वाट पाहत आहे. खरेतर पहलगाममध्ये हत्याकांड घडवून पाकिस्तानने भारताच्या विरोधात फार मोठा जुगार खेळला आहे.

टी.व्ही. स्टुडिओत बसून पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याची वल्गना करणारे अँकर आणि जनतेतील उन्मादी कोलाहल सरकारने आटोक्यात ठेवणे ही काळाची गरज आहे. युद्ध आणि मुत्सद्देगिरी हे गंभीर विषय टीआरपीसाठी वापरले जाऊ शकत नाहीत. देशातील व्हीआयपी आणि व्हीव्हीआयपी यांची संख्या जगात सर्वाधिक आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी हजारो प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी गुंतले आहेत. त्याची खरच गरज आहे का? एकीकडे सैन्य संख्या रोडावत आहे, तेथे अग्निवीरसारखी कंत्राटी योजना राबविण्यात येते तर दुसरीकडे या तथाकथित अति महत्त्वाच्या व्यक्तींना संरक्षण देण्यासाठी प्रशिक्षित कमांडोजची नेमणूक करण्यात येते आणि काश्मीरमध्ये दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षा कर्मचारी नसणे हे कितपत योग्य आहे याचा विचार केला पाहिजे.

भारताच्या सीमेवरील भौगोलिक व राजकीय परिस्थिती, प्रचंड मोठी सागरी सीमा लक्षात घेता अग्निवीर योजनेचा गांभीर्याने पुनर्विचार होणे गरजेचे आहे. सहा महिन्यांच्या प्रशिक्षणाच्या आधारे हे अग्निवीर सियाचिन, पूर्वोत्तर खडतर प्रदेश, पश्चिमेच्या वाळवंटात कसे टिकाव धरतील? चार वर्षांच्या सेवेनंतर ७५ अग्निवीर सेवानिवृत्त होणार याचे दडपण त्यांच्यावर नक्की असणार हासुद्धा महत्त्वाचा घटक आहे. नौदल आणि वायुसेनेतील अग्निवीरांसमोर तर तंत्रज्ञान आणि समुद्रावरील जीवनाशी जुळवून घेण्यासाठी किमान दीड ते दोन वर्षे जातील, हे नाकारता येत नाही. नुकतेच तातडीने सरकारने अत्यंत कडक निर्णय घेतले ते किती परिणामी ठरतात ते काळच ठरवेल. सरकारने बोलाविलेली सर्वपक्षीय बैठक हे स्वागतार्ह पाऊल होते परंतु या बैठकीत सहभागी होण्याऐवजी मा. पंतप्रधान बिहार दौऱ्यावर जाणे मात्र खटकणारे आहे. काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी कोणतीही जादूची छडी उपलब्ध नाही, तो केवळ मुत्सद्दीपणाने सुटू शकतो याबाबत तज्ज्ञाज्ध्ये एकमत आहे. पाकिस्तान भारताच्या तुलनेत सर्व आघाड्यांवर खूप मागे आहे. जसे तो राजकीय अस्थिरता, लोकशाही मूल्यांचा ऱ्हास यामुळे प्रदीर्घ काळ ग्रासला आहे, तेथील अर्थव्यवस्था डबघाईस तर महागाई, बेरोजगारी आणि परकीय कर्जाचे ओझे हे विक्रमी पातळीवर पोहोचले आहे. दहशतवाद पोसल्याची किंमत त्यांना मोजावी लागत आहे. तर संयम, अराजकीय आणि धर्मनिरपेक्ष सैन्य, विकसनशील अर्थव्यवस्था आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही ही आपली बलस्थाने आहेत. पुलवामा हल्ल्याला आज सहा वर्षे पूर्ण झाली आहेत त्याचप्रमाणे पहलगाम आत्मघाती हल्ल्याला सुध्दा आज आठ दिवस झाली आहेत. देशभरात या २८ पर्यटकांना श्रद्धांजली वाहिली जात आहे. आजच्या दिनी त्या सर्व पर्यटकांना भावपूर्ण श्रध्दांजली!

**– प्रविण बागडे**
**नागपूर**

***

# माझ्या दृष्टीतून सुखी माणूस

सुख ही एक अशी भावना आहे जी प्रत्येकाच्या दृष्टीने वेगळी असते. काहींसाठी सुख म्हणजे भरपूर संपत्ती, आलिशान घर, गाडी; तर काहींसाठी ते म्हणजे शांत जीवन, प्रेमळ नाती आणि आरोग्य. ''माझ्या दृष्टीतून सुखी माणूस'' माझ्या दृष्टीने ''जो माणूस सुखी वाटतो तो सुखी'' असा या शब्दसमूहाचा अर्थ होता. नंतर विचार केला मग वेळोवेळी जशी माझी वृत्ती बदलेल तशी सुखी माणसेही वेळोवेळी बदलत जातील. धर्मराजाला जशी सर्वच माणसे सुष्ट वाटली आणि दुर्योधनाला जशी सर्वच माणसे दुष्ट वाटली, त्याचप्रमाणे मी सुखी असेल त्यावेळी मला माणसे सुखी वाटतील आणि मी दुःखी असेल त्यावेळी दुःखी वाटतील. पण त्यावरून खरा सुखी कोण अथवा दुःखी कोण या गोष्टींचा उलगडा होणार नाही. पण अशा तऱ्हेने विचारांची गुंतागुंत सोडवताना श्री समर्थ रामदासांची अमर काव्यपंक्ती आठवली.

''जगी सर्व सुखी असा कोण आहे?'' संपूर्णतः सुखी माणूस जगात नाही हेच व्यावहारिक सत्य त्यांना मांडावयाचे आहे. पण सुखाचा शोध करणे ही मनुष्य मात्राची नैसर्गिक प्रवृत्तीच आहे. तिच्याविरुद्ध कसे जाणार? मग अशा रीतीने आपण जगाकडे पाहू लागलो की, आपल्या मनात विचार येतो, ''खरे आहे जगात सुख थोडे आहे पण ते कोणाला तरी मिळते आहेच.'' मग हे सुख कोणाला मिळाले आहे हे पाहण्याकरिता मी आजूबाजूला नजर टाकून विचार केला, पुष्कळ वेळा आढळतात जगतानाही किरकिरत असणारी माणसे! यांची सुखाची कल्पना संकुचित आहे की व्यापक? ना. सी. फडके म्हणतात, ''ज्यांची सुखाची कल्पना संकुचित असते ते मोठे नव्हेत.'' म्हणजे मनाच्या संकुचित किंवा व्यापक वृत्तीवर सुख अवलंबून असते. साधूसंताना आयुष्यात सुख मिळाले याचे कारण त्यांच्या मनाची व्यापक वृत्ती. सर्वांभूती परमेश्वर पाहण्याच्या वृत्तीत पाखराने शेत खाल्ले म्हणून गुरुनानकांना खेद झाला नाही, खंत वाटली नाही. माणसांना सुख मिळविण्याच्या मार्गात आणखी एक अडथळा असतो व तो म्हणजे ''भीती.'' निर्भयता प्राप्त झाली की सुख मिळते. हा सुखाचा राजमार्ग ज्यांना सापडला ते धन्य होत. आधुनिक शोधांनी समृद्धी वाढली आहे पण सुख वाढले आहे का? सुख सोयींच्या साधनांबरोबर सुखाची समृद्धी झालेली का आढळून येत नाही? सुख हे मनाच्या समाधानी वृत्तीवर अवलंबून असते व मनाची समाधानी वृत्ती समृद्धीवर अवलंबून असते. सारांशत: म्हणावयाचे तर सुखी माणूस तो ज्याला या चार सत्याची जाणीव झाली.

१) मनाची वृत्ती संकुचित न ठेवता व्यापक केली की सुख मिळते. २) प्रेम धर्माने भीती नष्ट होते व निर्भयतेतच सुख मिळते. ३) पराभूत मनोवृत्ती सोडून लढाऊ वृत्ती अवलंबिल्याने यश व सुख मिळते. ४) सुख उपभोगात नसते सुख त्यागात असते.

सुख हे बाह्य गोष्टींवर अवलंबून नसून अंत:करणातून येणारा अनुभव आहे.कोट्याधीश असूनही जर माणूस अस्वस्थ असेल, सतत चिंतेत असेल, तर तो सुखी कसा म्हणावा? याउलट एक साधा शेतकरी जेव्हा आपल्या कुटुंबासोबत जेवणाच्या वेळेस हसत–खेळत संवाद साधतो, तेव्हा तो देखील तितकाच सुखी असतो जितका एखादा श्रीमंत उद्योगपती. माझ्या मते, खऱ्या अर्थाने सुखी माणूस तोच, जो आपल्या प्राप्त परिस्थितीत समाधानी आहे, आणि त्याला आपल्या कुटुंबातील प्रेम, समाजातील सन्मान आणि आत्मिक शांतता लाभली आहे.

सुखी माणसाची काही लक्षणे अशी असतात :– तो नेहमी सकारात्मक विचार करतो. त्याला इतरांविषयी द्वेष नसतो. तो स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवतो. संकटातही तो धीर राखतो. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तो इतरांचेही जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करतो. सुखासाठी स्पर्धा, मत्सर, लोभ हे मार्ग कधीच योग्य नाहीत. जेव्हा आपण आपल्या छोट्या–छोट्या गोष्टींतून समाधान शोधू लागतो, तेव्हाच आपले आयुष्य खरे सुखी होते.

सुख ही कोणत्याही दुकानात मिळणारी वस्तू नाही, ती मनःस्थिती आहे. ती निर्माण करावी लागते. ''सुख शोधण्यात नाही, तर अनुभवण्यात आहे.'' जो माणूस हा अनुभव समजून घेतो, तोच माझ्या दृष्टीने खरा सुखी माणूस आहे.

**– शिल्पा अष्टमकर**


***

# का होतात बलात्कार? जाणून घ्या बलात्कारीचे मानसशास्त्र

आजकाल आपण सातत्याने बलात्कार, सामूहिक बलात्कार, अल्पवयीन मुलींवर होणारे, नात्यातील महिला, मुलींवर होणारे बलात्कार याबद्दल ऐकत असतो. अश्या घटना घडल्यावर सर्वसामान्य माणूस अनेक तर्क, वितर्क, अंदाज, अर्थ त्याच्या मानसिकतेनुसार, अनुभवानुसार, अकालनानुसार लावत असतो. आपण वरवर पाहता खूप खोलात अभ्यास न करता अशा घटनांचे विश्लेषण करून मोकळे होतो. का ठराविक व्यक्तीचं बलात्कार करतात? त्यामागे कोणते कारण आहे? त्यात मानस शास्त्राचा किती मोठा भाग आहे हे आपण या लेखातून जाणून घेणार आहोत. बलात्कार करणाऱ्या व्यक्तीचे मानसशास्त्र अत्यंत महत्त्वाचा विषय असून, सामूहिक बलात्काराची कारणे सुद्धा अत्यंत गहन असतात. बलात्कार हा एक अत्यंत गंभीर आणि हिंसक गुन्हा आहे. हे कृत्य लैंगिक सुखापेक्षा सत्ता, नियंत्रण आणि हिंसा दर्शवण्याशी अधिक संबंधित असते.

**बलात्कार करणाऱ्या व्यक्तीचे मानसशास्त्र**

सत्ता आणि नियंत्रण : अनेक बलात्कारी व्यक्ती इतरांवर, विशेषत महिलांवर, सत्ता गाजवण्याचा आणि त्यांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत असतात. बलात्कार हे त्यांना स्वतःला शक्तिशाली आणि इतरांना दुबळे दाखवण्याचे एक साधन वाटते. पीडितेचा अपमान करणे आणि तिला असहाय्य बनवणे हा त्यांचा मुख्य हेतू असू शकतो. राग आणि द्वेष : काही व्यक्तींच्या मनात महिलांबद्दल तीव्र राग किंवा द्वेष असतो. बलात्कार हा त्यांच्या रागाला किंवा सूड भावनेला वाट करून देण्याचा एक हिंसक मार्ग असू शकतो. सहानुभूतीचा अभाव : अशा व्यक्तींमध्ये दुसऱ्यांच्या भावना समजून घेण्याची किंवा त्यांच्या दुःखाबद्दल सहानुभूती दाखवण्याची क्षमता कमी असते किंवा नसते. ते पीडितेच्या वेदना, भीती आणि त्रासाबद्दल विचार करत नाहीत. पीडितेला ते एक वस्तू म्हणून पाहू शकतात. विकृत लैंगिक कल्पना : काही प्रकरणांमध्ये, व्यक्तीच्या मनात विकृत किंवा हिंसक लैंगिक कल्पना असू शकतात. त्यांना सक्तीच्या किंवा हिंसक लैंगिक कृत्यांमध्ये उत्तेजना मिळू शकते. हक्काची भावना : काही पुरुषांना असे वाटते की त्यांना लैंगिक संबंधांवर हक्क आहे आणि महिलांनी त्यांच्या इच्छा पूर्ण केल्या पाहिजेत. नकार ऐकण्याची त्यांची तयारी नसते आणि नकार मिळाल्यास ते बळजबरीने आपली इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. व्यक्तिमत्त्व विकार : काही बलात्कारी व्यक्तींमध्ये अँटीसोशल पर्सनॅलिटी डिसऑर्डर किंवा नार्सिसिस्टिक पर्सनॅलिटी डिसऑर्डर सारखे मानसिक विकार असू शकतात. यामुळे त्यांच्यात सहानुभूतीचा अभाव, नियमांचे उल्लंघन करण्याची प्रवृत्ती आणि इतरांचा वापर करण्याची वृत्ती दिसून येते. भूतकाळातील अनुभव : काही वेळा व्यक्तीच्या भूतकाळात लैंगिक शोषण, हिंसा किंवा दुर्लक्षित बालपण यांसारखे अनुभव आलेले असू शकतात. हे अनुभव त्यांच्या मानसिकतेवर परिणाम करू शकतात, पण हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की असे अनुभव आलेली प्रत्येक व्यक्ती गुन्हेगार बनतेच असे नाही आणि हे बलात्काराचे समर्थन होऊ शकत नाही. सामूहिक बलात्कार का केला जातो? सामूहिक बलात्कार हा वैयक्तिक बलात्कारापेक्षा अधिक गुंतागुंतीचा असतो आणि त्यात समूहाची मानसिकता महत्त्वाची भूमिका बजावते याची काही कारणे...समूहाचा दबाव आणि स्वीकृती : गटातील सदस्य एकमेकांना अशा कृत्यासाठी प्रवृत्त करू शकतात किंवा दबाव टाकू शकतात. गटात आपले स्थान टिकवण्यासाठी किंवा मर्द असल्याचे सिद्ध करण्यासाठी काहीजण यात सामील होतात. जबाबदारीचे विभाजन : जेव्हा अनेक जण एकत्र गुन्हा करतात, तेव्हा प्रत्येकाला वाटते की आपल्या एकट्यावर संपूर्ण जबाबदारी येणार नाही. मी एकटाच नाही, सगळेच करत आहेत या भावनेमुळे गुन्हा करण्याची भीती कमी होते. शक्ती प्रदर्शन आणि वर्चस्व: समूह मिळून पीडितेवर हल्ला करून आपले एकत्रित वर्चस्व आणि ताकद दाखवण्याचा प्रयत्न करतो. हे पीडितेला जास्त भयभीत आणि अपमानित करण्यासाठी केले जाते. वाढलेली आक्रमकता : समूहात असताना व्यक्तीची आक्रमकता वाढू शकते. एकमेकांच्या उत्तेजनामुळे आणि धाडसामुळे ते अधिक हिंसक कृत्य करू शकतात. एकत्र बांधले जाणे : काही वेळा, एकत्र मिळून एखादा गुन्हा किंवा चुकीचे कृत्य केल्याने गटातील सदस्यांमध्ये एक विकृत प्रकारची एकता किंवा बांधिलकी निर्माण होते.नियोजन आणि संधी : काही सामूहिक बलात्कार पूर्वनियोजित असू शकतात, ज्यात पीडितेला हेतुपुरस्सर लक्ष्य केले जाते. कधीकधी, अचानक मिळालेल्या संधीचा फायदा घेऊनही असे कृत्य केले जाते. पीडितेचे वस्तूकरण : समूहात असताना पीडितेला माणूस म्हणून न पाहता केवळ एक वस्तू म्हणून पाहिले जाण्याची शक्यता वाढते, ज्यामुळे तिच्यावर अत्याचार करणे सोपे जाते.बलात्कार हे कधीही पीडितेच्या वागणुकीमुळे किंवा कपड्यांमुळे होत नाही. याची संपूर्ण जबाबदारी फक्त आणि फक्त गुन्हेगाराची असते.



बलात्काराच्या मानसशास्त्राचा अभ्यास हा गुन्हेगारांना समजून घेण्यासाठी किंवा गुन्हेगारी रोखण्यासाठी केला जातो, त्यांच्या कृत्यांचे समर्थन करण्यासाठी नाही. पीडितांना सहानुभूती, आधार आणि न्याय मिळणे अत्यंत आवश्यक आहे.बलात्कार हा समाजावरचा एक मोठा डाग आहे आणि तो रोखण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी, जनजागृती आणि मानसिकतेत बदल घडवणे गरजेचे आहे. महिलांनी सुद्धा जागृत राहणे, सतर्क राहणे, कोणाच्याही चुकीच्या हेतूची चाहूल लक्षात आल्यास तातडीने कठोर भूमिका घेणे महत्वाचे आहे. स्वत:चे संरक्षण करण्यासाठी, अशा विकृत मानसिकतेच्या लोकांना योग्य ते शासन मिळावे म्हणून न घाबरता, न लाजता थोडी पण चुकीच्या हेतूची जाणीव झाल्यास पोलीस प्रशासन ची मदत घेणे, घरातील लोकांना विश्वासात घेवून चर्चा करणे आवश्यक आहे.लहान मुली, कुमार, कुमारिका, युवती यांना सुद्धा न लाजता किंवा कोणताही आडपडदा न ठेवता गुड टच, बॅड टच, पुरुषाचे चुकीचे हेतू, वाईट नजर ओळखणे याबद्दल सातत्याने प्रबोधन आणि प्रशिक्षण देणे काळाची गरज आहे. छोट्या मुलींना घरातून, शाळेतून याबद्दल समुपदेशन होणे, त्यांना असुरक्षित वाटतं असल्यास, त्या अस्वस्थ असल्यास लगेच त्यांच्या हालचाली लक्षात घेवून त्यांना विचारणा करणे, वैद्यकीय तपासणी करणे, मुलींना आधार, धीर देणे यावर पालकांनी भर देणे अपेक्षित आहे. आपली लहान मुलं कोणाला टाळतात, कोणाला घाबरतात, शांत राहतात का, कुठे ठराविक ठिकाणी जायला नाही म्हणतात का यामागील कारणे जाणून घेणे गरजेचे आहे.

**–मीनाक्षी जगदाळे**

***

**ग्लोबल भारत** हे पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक **शरद खेमचंद अडागळे** यांनी विश्व प्रकाशन प्रिंटर्स औरंगाबाद जालना हायवे रोड बदनापुर जिल्हा जालना(महाराष्ट्र) पिन ४३१२०२ येथे छापुन दैनिक ग्लोबल भारत कार्यालय हाऊस नं १/११/ ११७ शांतीपुरा नंदनवन कॉलनी रोड छावणी औरंगाबाद (महाराष्ट्र) पिन ४३१००१ येथे प्रकाशित केला मो ९४०३५०२५५५ / हॉटसअप ९९२११७३९५३, ईमेल dailyglobalbharat@gmail.com
(या अंकात व्यक्त केलेल्या मजकुराशी संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक सहमत नाहीत.,औरंगाबाद न्यायालया अंतर्गत)

# शेती महामंडळाच्या २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाकडून घरे देणार; ५०० कोटी उत्पन्न मिळविण्याचे महामंडळाला उद्दिष्ट-महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- शेती महामंडळाच्या सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांनी महामंडळ विकसित करण्यासाठी आपले योगदान दिले आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना राहण्यासाठी योग्य अशा सदनिका म्हाडाच्या माध्यमातून बांधून देण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या संचालक मंडळाची ३२७ वी बैठक मंत्रालयातील महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. बैठकीला महसूल राज्यमंत्री योगेश कदम, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेती महामंडळाच्या १४ शेतमळ्यांवर २९६६ निवासस्थाने आहेत. यापैकी १७८६ निवासस्थाने राहण्यास अयोग्य ठरविण्यात आली आहेत. त्यामुळे ही निवासस्थाने रिक्त करण्याचा प्रस्ताव महामंडळाने बैठकीसाठी ठेवला होता. यावर चर्चा करताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेती महामंडळाच्या सर्वच सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाच्या माध्यमातून चांगली घरे उपलब्ध करुन देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. गिरणी कामगारांप्रमाणे या कामगारांनाही चांगली घरे मिळाली पाहिजेत अशी भूमिका त्यांनी यावेळी घेतली. त्याला महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनीही दुजोरा दिला. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाला उत्पन्न वाढविण्यासाठी ५०० कोटींचे उद्दिष्ट बैठकीत देण्यात आले आहे. महामंडळाच्या ताब्यात असलेल्या सुमारे ३० हजार एकर जागेवर विविध उपक्रम राबवून हे उत्पन्न वाढविण्याच्या सूचना महसूलमंत्र्यांनी केल्या. त्याबरोबरच शेती महामंडळाच्या कोणत्याही जागा मोफत वापरासाठी न देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. शेती महामंडळाच्या मळ्यावरील सेवानिवृत्त, राजीनामा दिलेल्या, मयत कर्मचाऱ्यांना बोनस वाटपास मंजुरी देण्यात आली. तर महामंडळाच्या जमिनीवर संयुक्त शेती पद्धतीने पीक योजना राबविण्यासाठी वीज आणि सौरपंप जोडणी मिळण्याबाबत तसेच सौरऊर्जा प्रकल्पासाठी ऊर्जा विभागाच्या प्रचलित भाडेपट्ट्याने जागा देण्यासाठी बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोकमठाण येथील महामंडळाची जमीन वखार महामंडळास व्यवसायाकरिता देणे, अकृषिक जमिनी विना निविदा शासनाच्या संलग्न संस्थांना भाडेपट्टाने देणे, संयुक्त शेतीसाठी ब्लॉकचा कालावधी १ एप्रिलपासून सुरु करणे, १४ मळ्यांमधील शेतजमीन भूमी अभिलेख विभागाकडे शुल्क भरून मोजणी करुन घेणे, पुणे मुख्यालय येथील ५४ सदनिका यांचे वापरमूल्य दर सुधारित करणे, १ ते २ गुंठ्याच्या



आतील शिल्लक क्षेत्र विक्री करण्यास मान्यता देणे, नाशिक जिल्ह्यातील काष्टी ता. मालेगाव येथील १२ हेक्टर १७ आर जागा राहूरी कृषी विद्यापीठास पैशांची आकारणी करुन मंजुरी देणे आदी विषय बैठकीत मंजूर करण्यात आले.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने नियोजन करणे आवश्यक-जिल्हाधिकारी किशन जावळे

रायगड दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- रायगड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज तसेच अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. आपत्ती काळात सर्व यंत्रणानी सतर्क व दक्ष रहावे, तसेच मान्सून पूर्व तयारी करताना सर्व बाबींची काटेकोरपणे तपासणी आणि उपाययोजना करावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय मान्सून पूर्व तयारी आढावा बैठक २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्र.पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री जावळे म्हणाले, सर्व शासकीय यंत्रणानी अतिधोकादायक व धोक्याची संभावना असलेल्या ठिकाणांची पाहणी करावी. या ठिकाणच्या नागरिकांना मान्सून कालावधीमध्ये सुरक्षित जागी स्थलांतरीत करता यावे यासाठी निवाऱ्याची सज्जता करावी. तसेच या काळात उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी व तहसीलदार यांनी उत्तम समन्वय राखत काम करावे. नगरपालिका, महानगरपालिकांनी नालेसफाईची कामे ३१ मे पूर्वी पूर्ण करावीत. तसेच महाड शहरात दरवर्षी पूर परिस्थिती निर्माण होते. अशा पूरपरिस्थितीत मदत कार्य व बचावासाठी आवश्यक पूर्वतयारी व उपाययोजना केली जावी.सर्व शासकीय यंत्रणांनी आपदा मित्रांची बैठक घेऊन नियोजन करावे. आपत्तीच्या प्रसंगी रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग आदी विभागांनी देखील नागरिकांच्या मदत व सुरक्षेच्या दृष्टीने पूर्वतयारी करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक पूलांची




तपासणी करून आवश्यक दुरुस्ती तात्काळ करावी व पर्यायी मार्ग सुस्थितीत ठेवावेत. तसेच रस्त्यावरील खडे, साईडपट्टी भरुन घेणे, रस्त्यावरील ब्लिंकर्स, बोर्ड, डायव्हर्शनचे बोर्ड, ब्लॅक स्पॉटवर रिफ्लेक्टर्स बसवावेत. सर्व विभागांकडील शोध व बचाव साहित्यांची दुरुस्ती करून सर्व साहित्य सुस्थितीत राहील, याची दक्षता घ्यावी. आवश्यक शोध व बचाव पथक, रुग्णवाहिका, स्थलांतराचे ठिकाण, अन्न पाण्याची व्यवस्था, जेसीबी मशिन्स, वूड कटर्स, बोट, लाईफ जॅकेट, स्पीड बोट, जनरेटर इ. साहित्य व मनुष्यबळ सर्व विभागांनी सज्ज ठेवावेत. पूर परिस्थितीमुळे रोगराई पसरुन साथरोगाचा धोका असतो. अशा ठिकाणी फवारणी करावी. पुरेसा औषधांचा साठा ठेवावा असे जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी सांगितले. दुर्घटना ठिकाणी वैद्यकीय मदत तातडीने मिळण्याच्या दृष्टीने जिल्हा शल्य चिकित्सकांशी समन्वय राखून आरोग्य विभागास काम करण्याच्या सूचना श्री जावळे यांनी यावेळी दिल्या. याचबरोबर अतिवृष्टीमध्ये नागरिकांनी धबधब्याच्या ठिकाणी, गडकिल्ले, धोकादायक ठिकाणी जावू नये. तसेच रायगड पाटबंधारे विभागाने धरणांची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अतिवृष्टी विचारात घेवून टप्प्या-टप्याने धरणांतून विसर्ग करावा अशा सूचनाही श्री जावळे यांनी केल्या. जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, तसेच या काळात पूर्व परवानगी शिवाय कुणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश ही त्यांनी यावेळी दिले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री शिर्के यांनी तालुकास्तरीय नियंत्रण कक्ष २४ ७ कार्यान्वित बाबत, तसेच विविध विभागांचे परिपूर्ण आपत्ती व्यवस्थापन आराखडे जिल्हा प्रशासनास पाठवण्याबाबत सांगितले. पुनर्वसन सुरू असलेल्या गावांतील कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबत सांगितले.

विविध विभागांच्या वतीने यावेळी आगामी मान्सून पूर्व तयारी बाबत सुरू असलेल्या कामांबद्दल माहिती देण्यात आली .मागील वर्षी घडलेल्या इर्शाळवाडी येथील दुर्घटना यासह विविध माहिती यावेळी देण्यात आली. बैठकीचे प्रास्ताविक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी केले. या बैठकीला उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यासह एन डी आर एफ, होमगार्ड ,महावितरण , सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक परिवहन अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे अधिकारी यासह विविध शासकीय विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्रातून गुणवत्ताधारक खेळाडू घडतील-मंत्री ॲड. आशिष शेलार

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- पनवेल महापालिकेने उभारलेल्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राची व्यवस्था उत्तम आहे. या प्रशिक्षण केंद्रासाठी महापालिकेने दिलीप वेंगसरकर यांची अगदी अचूक निवड केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली इथे गुणवत्ताधारक खेळाडू निश्चितच घडतील. तसेच पालिकेच्या प्रयत्नांमुळे या खेळाडूंना चांगल्या संधी नक्की मिळतील, असा विश्वास माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

पनवेल महापालिकेच्या नवीन पनवेल येथील नवनिर्मित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे भव्य उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या वेळी भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार पद्मश्री दिलीप वेंगसरकर, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, रायगड क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, सिडकोचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले की, दिलीप वेंगसरकर यांच्या सारख्या जाणकार क्रिकेटपटूंकडून प्रशिक्षण घेऊन या अकादमीतून उत्तम खेळाडू घडतील.

यावेळी पद्मश्री दिलीप वेंगसरकर म्हणाले, पनवेल कार्यक्षेत्रात क्रिकेट खेळाडूंमध्ये मोठ्या प्रमाणात गुणवत्ता दिसून येते. या क्रिकेट प्रशिक्षण केंद्रामुळे त्यांना मोठे व्यासपीठ मिळेल आणि इथले खेळाडू भविष्यात भारतीय क्रिकेट संघातून खेळताना दिसतील.

आयुक्त व प्रशासक मंगेश चितळे यांनी सांगितले की, हे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण केंद्र साडेसात एकर क्षेत्रावर साकारले असून यासाठी १४ कोटी ५५ लाख रुपये खर्च झाले आहेत. १५० मीटर व्यासाचे क्रिकेट मैदान, पॅव्हेलियन इमारत आणि इतर आवश्यक सुविधा येथे उभारण्यात आल्या आहेत.

# महाराष्ट्राची परंपरा, वारसा पुढे नेण्यासाठी सांगलीचेही योगदान राहिल-पालकमंत्री चंद्रकांत पाटील

सांगली दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महाराष्ट्राची वैभवशाली परंपरा आणि गौरवशाली वारसा पुढे नेण्यासाठी सांगली जिल्ह्याचेही योगदान राहील, यासाठी पालकमंत्री म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करू, अशी ग्वाही राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे दिली.

महाराष्ट्र दिनाच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात दिलेल्या शुभेच्छा संदेशात ते बोलत होते. पोलीस परेड ग्राउंड, विश्रामबाग येथे आयोजित या कार्यक्रमास खासदार विशाल पाटील, जिल्हाधिकारी अशोक काकडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, प्रभारी पोलीस अधीक्षक रितू खोखर, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी, पद्मश्री डॉ. विजयकुमार शहा यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा देऊन पालकमंत्री पाटील म्हणाले, गत वर्षी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वपूर्ण कामे हाती घेतली. चालू आर्थिक वर्षात ५४५ कोटी रूपयांची तरतूद केली आहे, असे त्यांनी सांगितले. पालकमंत्री पाटील म्हणाले, १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमात महसूल विभागाकडून तहसीलस्तरावर सातबारा पुस्तके, फेरफार पुस्तके व हक्क नोंद संचिका संकलनाची मोहीम हाती घेण्यात आली. यामध्ये ५ हजार ४३५ सात-बाराची पुस्तके, २ हजार २६८ फेरफार पुस्तके व तीन लाख २२ हजार ७८५ हक्क नोंद संचिका तलाठी कार्यालयातून तहसीलदारांच्या अभिलेखात जमा करण्यात आल्या. यामुळे जुने फेरफार व सात-बाराच्या नक्कल तहसिल कार्यालयात विनासायास मिळणे सुकर झाले आहे, असे ते म्हणाले.

अमली पदार्थ विरोधी कारवाई, प्रबोधन व व्यसनमुक्ती यांच्या माध्यमातून सांगली जिल्ह्यातून अमली पदार्थांच्या संकटाचे लवकरच समूळ उच्चाटन होईल, यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगून पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, सांगली जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी आपली नियुक्ती झाली, तेव्हा अमली पदार्थांच्या तस्करीचे मोठे आव्हान उभे होते. अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या माध्यमातून सर्वांनी एकजुटीने काम केले. त्यामुळे गेल्या तीन महिन्यात अमली पदार्थ विरोधी एकूण ४१ गुन्हे दाखल झाले. त्यामध्ये ६२ आरोपींना अटक करून जवळपास ३० कोटी रुपयांचा मुद्देमाल पकडण्यात यश आले. अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या व्यक्तिंवर उपचारासाठी कायम स्वरूपी चिकित्सा व व्यसनमुक्ती केंद्र लवकरच सुरू करत आहोत. प्रजासत्ताक दिनी जाहीर केल्याप्रमाणे खबऱ्यांना बक्षीसही देण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

बळीराजासाठी असलेल्या कल्याणकारी योजनांबद्दल बोलताना पालकमंत्री म्हणाले, गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतून गेल्या आर्थिक वर्षात १७२ शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे. सन २०२३-२४ खरीप हंगामात प्रधानमंत्री पीक विमा योजनेमधून साडेतीन लाख शेतकऱ्यांना १४१ कोटी ८४ लाख रूपये विमा भरपाई देण्यात आली आहे. हवामान आधारीत फळ पीक विमा योजनेमध्ये १० हजार ६८७ शेतकऱ्यांना २९ कोटी ८५ लाख रूपये अनुदान दिले आहे. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेमध्ये सन २०२४ २५ मध्ये ५६३ प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. त्यासाठी १३ कोटी ६२ लाख रूपये अनुदान मंजूर केले आहे. या योजनेमध्ये सांगली जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. जिल्हा परिषद कृषि विभागाने खरीप २०२५ मध्ये प्रायोगिक तत्त्वावर शेतीसाठी ड्रोन वापर प्रशिक्षण व अनुदानावर ड्रोन पुरवठा योजना सुरू केली आहे.

पालकमंत्री पाटील म्हणाले, मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जिल्ह्यात ४६ ठिकाणी एकूण ३१७ मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणी प्रगतीपथावर आहे. त्यातील बसर्गी, जिरग्याळ (ता. जत), माडगुळे, लिंगीवरे (ता. आटपाडी) आणि मणेराजुरी (ता. तासगाव) येथील एकूण २७ मेगावॅट क्षमतेचे पाच प्रकल्प सुरू झाले आहेत. पी. एम. सूर्यघर मुफ्त बिजली योजनेतून जिल्ह्यात ४ हजार ७४२ ग्राहकांनी घराच्या छतावर अनुदानित सोलर पॅनल बसवले आहेत, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

सामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी शासकीय रूग्णालयांचे बळकटीकरण करण्यात येत असल्याचे सांगून पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्हा वार्षिक योजनेतून सांगली व मिरजच्या शासकीय रूग्णालयात अत्याधुनिक यंत्रसामुग्री व सर्जिकल साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. स्त्री रोग व प्रसूतिशास्त्र विभागासाठी लॅप्रोस्कोपी मशिन सुरू केले आहे. शासकीय रूग्णालयात चार हजारहून अधिक प्रसूती व दीड हजारहून अधिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया झाल्या. कामगार दिनाच्या शुभेच्छा देताना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रत्येक कामगाराच्या श्रमावरच राज्याची प्रगती होत असून सर्व उद्योग घटकात व अन्य क्षेत्रात काम करीत असलेल्या कामगार बांधवांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. अनेक सांगलीकरांनी जिल्ह्याची शान वाढवली असल्याचे सांगून महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित जिल्ह्यातील पाच क्रीडापटूंचे अभिनंदन त्यांनी यावेळी केले. तसेच, राष्ट्रपती पदकाने सन्मानित महापालिकेच्या अग्निशमन विभागाचे फायरमन कासाप्पा माने, केंद्रीय गृह मंत्रालयाकडून गौरवण्यात आलेले महानगरपालिकेच्या सुनिल माळी, बाबूराव कोळी आणि राजेंद्र कदम, पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित सहा पोलीस अंमलदारांचेही त्यांनी यावेळी अभिनंदन केले. पालकमंत्री पाटील म्हणाले, महिला व बाल विकास विभागाअंतर्गत कैलासवासी दादुकाका भिडे मुलांचे निरिक्षणगृह या संस्थेस उत्कृष्ट निरिक्षण गृह तसेच, भगिनी निवेदिता प्रतिष्ठान संचलित मुलींचे बालगृहास बालस्नेही पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. याच संस्थेतील कुमारी निकिता अभ्यंकर ही शासकीय परिचारिका पदावर रायगड येथे सेवेत रूजू झाली आहे. दिलासा भवन, मिरज संस्थेतील प्रथमेश चौगुले यांची कर निरीक्षकपदावर निवड झाली आहे. या सर्वांचे त्यांनी यावेळी अभिनंदन केले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. राष्ट्रगीत व राज्यगीत वादन करण्यात आले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी परेड निरीक्षण केले. परेड संचलनात पोलीस, पोलीस बँड, श्वान, निर्भया, बीडीडीएस, अग्निशमन, दंगल नियंत्रक पथक आदि पथकांचा समावेश होता. कार्यक्रमानंतर पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी उपस्थित पदाधिकारी, मान्यवर, स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिकांची भेट घेऊन महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र



राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त सांगली जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित जिल्ह्यातील पाच क्रीडापटूंचा सन्मान करण्यात आला. जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यातील अतिउंचीच्या भागात कर्तव्य पार पाडत असताना दोन्ही पायांना हिमबाधा झाल्याने अपंगत्व आलेले नायक धाकरेश बापू जाधव यांना सैनिक कल्याण विभागातून देण्यात येणारी वीस लाखांची आर्थिक मदत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते देण्यात आली.

# पुणे, पिंपरी- चिंचवड शहरासह पुणे महानगर प्रदेश क्षेत्राच्या विकासासाठी अधिकाधिक निधी देऊ-उपमुख्यमंत्री अजित पवार

पुणे दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- आगामी पाच वर्षात महाराष्ट्राच्या, वेगवेगळ्या शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहर तसेच पुणे महानगर प्रदेश क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकाधिक निधी दिला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.

सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी कमान ते फनटाइम थिएटरपर्यंत बांधण्यात आलेल्या २ हजार १२० मीटर लांबीच्या पुलाचे उद्घाटन (टप्पा क्र. २) च्या उद्घाटन प्रसंगी उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार हेमंत रासने, महानगर पालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त आयुक्त एमजे प्रदीप चंद्रन, पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, माजी महापौर दत्ता धनकवडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र दिनाच्या आणि जागतिक कामगार दिनाच्या शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, या पुलामुळे वडगाव, धायरी, नरे, नांदेड आणि खडकवासला येथील वेगाने वाढत असलेल्या परिसराचा वाहतुकीवरील ताण कमी होणार आहे. इनामदार चौक, हिंजवडी चौक, संतोष हॉल चौक, दत्त हॉटेल चौक आणि गोयेगाव असे पाच चौक ओलांडता येणार असल्यामुळे हवेचे प्रदूषण होणार नाही तसेच वाहतुकीसाठी अर्धा तास कमी होणार आहे. येथून सुमारे दीड लाख प्रवासी प्रवास करत असतात. हा उड्डाणपूल केवळ एक वाहतूक प्रकल्प नसून शहराच्या नवनिर्मितीचा एक महत्त्वाचा टप्पा आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड शहर वाढत असल्यामुळे पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने पुण्याला मुळशी धरणाचे आणि पिंपरी चिंचवडला ठोकरवाडी धरणाचे पाणी मिळावे, असा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. मध्यंतरी विमानतळाच्या नवीन टर्मिनलचे काम केले. ते देखील कमी पडत असल्यामुळे नवीन विमानतळाचे काम हाती घेतले आहे. काही नाराजी असली तरी जमीन घेतल्याशिवाय, पुनर्वसन केल्याशिवाय विकास होत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

पुण्यामध्ये वाहतुकीचा प्रश्न मोठा आहे. त्यासाठी येरवड्यापासून नवीन बोगदा, ई वाहने वाढण्याच्यादृष्टीने प्रोत्साहन पर रक्कम देण्यासाठी पुढच्या पाच वर्षांसाठी २ हजार कोटी रुपयांची तरतूद केली असून नदी सुधार प्रकल्पाच्या माध्यमातूनही शहरातील पर्यावरणाचा विचार केला जात आहे. ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित वाटण्याच्या दृष्टीने सुविधा देणे यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मुला-मुलींकरता रोजगार निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. टाटा ट्रस्ट आणि पुणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने ३५० कोटी रुपयांचा प्रकल्प बाणेर येथे हाती घेतला आहे. यातून येथील मुला मुलींना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. असे प्रशिक्षण रत्नागिरी तसेच गडचिरोली येथे सुरू केले असून छत्रपती संभाजीनगर, बीड येथे सुरू करण्यात येणार आहे.

जम्मू काश्मीर येथे घडलेल्या घटनेची बाब अत्यंत गंभीरतेने घेतली असून या घटनेच्या पार्श्वभीवर सुरक्षितता बळकट करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

हडपसर येथून यवतपर्यंत खालून ६ पदरी आणि वरून चार पदरी उन्नत मार्ग करण्याचा निर्णय कालच मंत्रिमंडळाने घेतला आहे. तसेच वडगाव शेरी पासून वाघोलीच्यापुढे शिक्रापूरपर्यंत वाहतूक कोंडी सोडवण्याच्या दृष्टीनेही निर्णय घेतला आहे. एक बाह्यवर्तुळ मार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळमार्फत आणि दुसरा पुणे महानगर प्रदेश विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. अशा पद्धतीने राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या विविध यंत्रणांच्या माध्यमातून कामे पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न चालू आहे, असेही ते म्हणाले.

केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ म्हणाले, या पुलासाठी सिंहगड रस्त्यावरील रहिवाशांनी गेल्या अनेक वर्षाची मागणी होती. सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीवरील ताण या पुलाच्या निर्मितीमुळे कमी होईल. पुण्यातील सर्वाधिक लांबीचा हा उड्डाणपूल ठरला. पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येचा, नागरीकरणाचा विचार करता या पुलाची आवश्यकता होती, असेही ते म्हणाले.

केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ पुढे म्हणाले की, पुण्याला देशातील सर्वो त्कृष्ट शहर करण्यासाठी राज्य शासन, केंद्र सरकार व महानगरपालिकेच्या वतीने अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प सुरू झाले आहेत. आज पुण्यामध्ये ३२ किलोमीटर पेक्षा अधिक लांबीची मेट्रो सुरू आहे. आता खडकवासला ते खराडी या नवीन मेट्रो मार्गालाही राज्य शासनाने मान्यता दिली असून विस्तृत प्रकल्प अहवाल झाले आहेत. पुढील काळामध्ये वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली मेट्रोची अंतिम मंजूरी केंद्र सरकारकडून लवकरात लवकर मिळवण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

शहरातील सार्वजनिक वाहतूक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. पीएमपीएमएलच्या ताफ्यामध्ये ई बसेस आणि सीएनजी बसेस मिळून जवळपास पंधराशे नवीन बसेस येत आहेत. २०१८-१९ मध्ये सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी आज उद्घाटन झालेल्या या पुलासह, नदीवरील सनसिटी ते कर्वेनगर पूल तसेच नळ स्टॉप चा दुहेरी उड्डाणपूल असे प्रकल्प हाती घेतले, अशी माहिती त्यांनी दिली. आज पुण्याचा कायापालट होत आहे. लोकसंख्या, नागरीकरण वाढल्यानंतर नागरी प्रश्न वाढतात मात्र ते सोडवण्यासाठी आधीच काळजी घेण्यात येत आहे. आजही देशात राहण्याचे सर्वात सुरक्षित शहर तसेच पहिली पसंती म्हणून पुण्याचे नाव घेतले जाते. त्यामुळे येथील नागरिकांच्या सुविधेसाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

पुलाच्या उद्घाटनानंतर उपमुख्यमंत्री पवार यांच्यासह अन्य मान्यवरांनी चार चाकी वाहनातून या पुलावरून प्रवास करून पाहणी केली.

**उड्डाणपुलाची वैशिष्ट्ये**

सिंहगड रस्त्यावरुन स्वारगेटकडे येताना वाहतूक कोंडी कमी करण्याच्यादृष्टीने तीन टप्प्यात उड्डाणपुलाचे काम हाती घेण्यात आले होते. कामाची निविदा ११८ कोटी ३७ लाख रुपयांची आहे. त्याअंतर्गत टप्पा १ मध्ये राजाराम पुलाजवळील स्वारगेट कडे जाणारा ५२० मी लांब एकेरी उड्डाणपूल ऑगस्ट २०२४ मध्ये वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. टप्पा २ मध्ये विठ्ठलवाडी ते फन टाईम थिएटर पर्यंतचा सिंहगड कडे जाणारा २.२ कि. मी. लांब उड्डाणपूल आज खुला करण्यात आला तर टप्पा ३ च्या इंडिअन ह्यूम गेट (गोयल गंगा चौक) ते इनामदार चौक पर्यंतच्या स्वारगेटकडे जाणाऱ्या १.५ कि. मी. लांबीच्या उड्डाणपूलाचे काम १५ जून २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. टप्पा २ च्या पुलाचे काम प्रिस्ट्रेस बॉक्स गर्डर पद्धतीने करण्यात आले आहे. उड्डाणपुलाच्या रस्त्याची रुंदी ७.३ मी असून एकूण पिलर ६० आहेत.

## मराठी भाषा विभागाकडून 'अभिजात मराठी' या आगामी ओटीटी प्लॅटफॉर्मची घोषणा; उदय सामंत यांच्या हस्ते लोगो लाँच!

### मराठी मनोरंजनासाठी आणि भाषेच्या गौरवासाठी नवा अध्याय सुरू!

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महायुती सरकारच्या अथक प्रयत्नांना दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ यश मिळाल्यामुळे आपल्या मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा प्राप्त झाला. या गौरवाच्या प्रेरणेतून,१ मे २०२५ रोजी मुंबईतील रविंद्र नाट्य मंदिर, मिनी थिएटर येथे 'राजभाषा मराठी दिन विशेष कार्यक्रम' पार पडला.या कार्यक्रमात मा. मंत्री डॉ. उदय सामंत, मराठी भाषा विभागाचे सचिव आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत'अभिजात मराठी' या नव्या ओटीटी प्लॅटफॉर्मचा लोगो आणि घोषणा करण्यात आली.

ए आय आणि ग्लोबल कंटेंटच्या युगातही आपली मायबोली अभिमानाने उभी राहावी यासाठी सुमन एंटरटेनमेंटने 'अभिजात मराठी' या ओटीटी प्लॅटफॉर्मचा संकल्प केला आहे. सध्या अनेक मराठी कलाकृतींना प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्मवर कमी प्राधान्य दिलं जातं. 'अभिजात मराठी' हे त्यावर एक सशक्त आणि हक्काचं उत्तर ठरणार आहे.जगभरातील सुमारे २० कोटी मराठी भाषिक प्रेक्षकांना एकत्र जोडण्यासाठी 'अभिजात मराठी' हे व्यासपीठ उभं राहत आहे. ही केवळ एक ओटीटी सेवा नाही, तर भाषेचा सन्मान आणि मराठी निर्मात्यांसाठी नवा श्वास ठरणार आहे.

मा. मंत्री डॉ. उदय सामंत, आपल्या भाषणात म्हणाले ,''मराठी ओटीटी प्लॅटफॉर्म ही आता काळाची आणि भाषेची गरज बनली आहे.मराठी भाषेचं सामर्थ्य, तिचं जतन, प्रचार आणि प्रसार हेच आमचं ब्रीदवाक्य आहे. आज मोबाइल हातात आल्यावर आपण दररोज १-२ चित्रपट हेडफोन लावून पाहतो.जर अभिजात मराठी सारखा मराठीचा स्वतंत्र ओटीटी प्लॅटफॉर्म प्रत्येकाच्या हातात असेल, तर त्यातून मराठी भाषेचं संवर्धन, प्रचार आणि उत्तम साहित्य पुढच्या पिढीपर्यंत पोहोचू शकतं. म्हणूनच हे व्यासपीठ अत्यावश्यक आणि अत्यंत काळानुरूप आहे.''

'अभिजात मराठी' हे ओटीटी व्यासपीठ पूर्णपणे मोफत स्वरूपात प्रेक्षकांसाठी उपलब्ध असणार आहे. यावर दर्जेदार मराठी चित्रपट, वेबसीरिज आणि लघुपटांचा समृद्ध संग्रह प्रेक्षकांना पाहायला मिळेल. याव्यतिरिक्त, इतर भारतीय भाषांतील निवडक चित्रपट मराठीत डब करून सादर करण्यात येणार आहेत, जेणेकरून भाषेची अडचण न वाटता सर्वांना दर्जेदार आशयाचा आनंद घेता येईल. तसेच, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या आशयासोबत मराठी सबटायटल्स देण्यात येणार आहेत, ज्यामुळे जागतिक कंटेंटही मायबोलीत अनुभवता येणार आहे.

अभिजात मराठी चे संस्थापक केदार जोशी ह्यांनी सांगितले '''अभिजात मराठी' केवळ एक ओटीटी प्लॅटफॉर्म नाही, ती आपल्या भाषेची, आपल्या अस्मितेची, आणि आपल्या संस्कृतीची डिजिटल चळवळ आहे. ही भाषा जगायची आहे, टिकवायची आहे म्हणून हे व्यासपीठ आम्ही निर्माण करतोय !''



'अभिजात मराठी' ओटीटीचा सॉफ्ट लॉन्च जुलै २०२५ मध्ये होणार असून, तो १,००० निवडक प्रेक्षकांसाठी खास प्रिव्ह्यू स्वरूपात असेल. त्यानंतर, ऑक्टोबर २०२५ मध्ये मराठी भाषा आठवड्याच्या निमित्ताने या प्लॅटफॉर्मचा अधिकृत भव्य लॉन्च करण्यात येणार आहे. हा टप्पा मराठी प्रेक्षकांसाठी आणि संपूर्ण इंडस्ट्रीसाठी एक ऐतिहासिक क्षण ठरेल.

सर्व प्रकारच्या मराठी कंटेंटसाठी खुले आवाहन: 'अभिजात मराठी' या व्यासपीठावर प्रसारित होण्यासाठी आपल्या दर्जेदार मराठी कलाकृतींचं स्वागत करण्यात येत आहे. हे व्यासपीठ प्रामुख्याने चित्रपट, वेबसीरिज आणि लघुपट यांसारख्या विविध प्रकारच्या कंटेंटसाठी खुले असून, नवोदित आणि अनुभवी निर्मात्यांना एक नवी संधी देण्यासाठी तयार आहे. कंटेंट पाठवण्यासाठी तुम्ही खाली दिलेल्या ई-मेल वर संपर्क करू शकता टीप कृपया तुमचं संपूर्ण प्रोफाइल व कंटेंट लिंक्ससहित सबमिट करावं.

''आपली भाषा, आपली संस्कृती आणि आपला अभिमान 'अभिजात मराठी'सोबत आता संपूर्ण जगभर झळकणार!'' १ मे २०२५ रोजी या उपक्रमाची केवळ अधिकृत घोषणा करण्यात आली आहे मात्र लवकरच 'अभिजात मराठी' ओटीटी प्लॅटफॉर्म आपल्या मायबोलीसाठी एक भक्कम जागतिक व्यासपीठ ठरेल, जिथून मराठीची श्रीमंती, संस्कृती आणि प्रतिभा अखंड जगभर झळकणार आहे!

## कमीलियंट ने दिले सर्वात कठीण परीक्षेला आव्हान

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- कमीलियंट, हा ब्रँड जो त्याच्या ठाम, मजबूत आणि स्टायलिश लगेजसाठी ओळखला जातो, २०१४ मध्ये स्थापनेपासून प्रवास बॅग्जच्या जगात क्रांती घडवत आहे. कमीलियंट म्हणजे बळकटपणा आणि जिवंत डिझाइन यांचं अनोखं संयोग, जो आजच्या प्रवाशांसाठी एक आदर्श पर्याय ठरतो अशा प्रवाशांसाठी जे विश्वसनीयतेसोबत कोणत्याही प्रकारचा सौंदर्यावर तडजोड करत नाहीत. कोणत्याही प्रकारच्या प्रवासासाठी तयार केलेलं कमीलियंट लगेज प्रत्येक आव्हानासाठी सज्ज असतं मग तो एखादा ॲडव्हेंचर कॅम्प असो किंवा साहसांनी भरलेली सफर!

आपल्या पहिल्या टीव्हीसी मोहिमेच्या यशस्वी सुरुवातीनंतर, कमीलियंट आणखी एका जबरदस्त सिक्वेलसह परत आलं आहे! या वेळी बॉलिवूडचा ॲक्शन स्टार टायगर श्रॉफ आणि बहुपरिणामी अभिनेत्री निकिता दत्ता यांच्या सोबत, ही नवीन जाहिरात एक लोकप्रिय भारतीय ऐतिहासिक चित्रपटाची विनोदी शैलीतील झलक आहे, जी हास्य आणि नाट्यमय ढंगात एक प्रतिष्ठित ऐतिहासिक युद्ध दाखवते आणि त्याचदरम्यान कमीलियंटच्या मजबुतीची खरी परीक्षा घेतली जाते.

## शौचालय स्वच्छतेचा सम्राट आणि बॉलीवूडचा बादशहा आले एकत्र

मुंबई दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- भारतातील क्रमांक १ शौचालय व बाथरूम क्लिनर आणि १० कोटींपेक्षा अधिक कुटुंबांचा विश्वास संपादन करणाऱ्या गृहस्वच्छतेच्या अग्रगण्य ब्रँड हारपिकने आज आपल्या यशस्वी प्रवासातील एक ऐतिहासिक क्षण जाहीर केला आहे, बॉलीवूडचा बादशहा शाहरुख खान आता हारपिकचा ब्रँड ॲम्बेसेडर असेल. ही विशेष भागीदारी हारपिकनेच्या उत्कृष्ट स्वच्छतेच्या परंपरेला शाहरुख खानच्या लोकप्रियतेशी, मूल्यांशी आणि भारतीय कुटुंबांवरील प्रभावाशी जोडते.

शंभर वर्षांहून अधिक काळापासून हारपिकने जागतिक पातळीवर स्वच्छता आणि आरोग्याच्या मानकांना नव्याने परिभाषित करण्याचे नेतृत्व केले आहे. आज हारपिक भारतातील दर तीनपैकी एका कुटुंबापर्यंत पोहोचत असून, शहरी तसेच ग्रामीण भागातील कुटुंबांना सक्षम बनवण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली आहे. हे एक प्रभावी, विश्वासार्ह आणि शक्तिशाली स्वच्छतेचे समाधान प्रदान करते. शाहरुख खान यांच्यासोबतची भागीदारी हा हारपिकच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे, जो प्रत्येक भारतीय घरात स्वच्छता, सन्मान आणि काळजीची प्रेरणा देण्याचे उद्दिष्ट बाळगतो.

ब्रँडसोबतच्या आपल्या नात्याबद्दल बोलताना शाहरुख खान म्हणाले, ''स्वच्छता ही लहान पण महत्त्वपूर्ण कृतींनी सुरू होते. हारपिकसारख्या ब्रँडसोबत भागीदारी करताना मला आनंद आणि अभिमान वाटतो, ज्याने अनेक वर्षांपासून भारतीय घरांमध्ये स्वच्छता आणि सन्मान यासाठी सतत काम केले आहे. मी त्या सर्व गृहिणींना या घरांच्या खऱ्या नायकांना मनापासून सलाम करतो, ज्या आपल्या कुटुंबाच्या आरोग्य आणि आनंदासाठी निःस्वार्थपणे मेहनत घेतात. त्या उत्तमतेस पात्र आहेत. 'हारपिक है ना'मुळे आता प्रत्येक घराला अवघ्या पाच मिनिटांत उत्कृष्ट स्वच्छता, प्रभावी क्लिनिंग आणि दीर्घकाळ टिकणारा ताजेपणा मिळू शकेल. जसं जीवनात काही क्षणांना विश्वासार्ह आधाराची गरज असते, तसं 'हारपिक है ना' हे प्रत्येक घरासाठी एक विश्वासार्ह साथीदार ठरतं.'' या ऐतिहासिक भागीदारीच्या प्रारंभाच्या निमित्ताने, हारपिक शाहरुख खानसोबतचा नवीन टीव्हीसी ''हारपिक है ना'' लाँच करणार आहे, ज्यामध्ये हारपिक टॉयलेट क्लिनरची उत्कृष्टता दाखवली जाईल.

## पान १ वरून

### नराधम दत्ता गाडेचा फोन...

दत्तात्रय रामदास गाडे (वय ३७, रा. गुनाट, शिरूर) हा त्या प्रकरणातील आरोपी असून त्याने तरुणीवर दोन वेळा बलात्कार केल्याची घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता.

या अत्याचार प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिस आयुक्तांनी हा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग केला होता. गुन्हा केल्यानंतर दत्ता गाडे त्याच्या मुळगावी गुनाट गावामध्ये लपून बसला होता. पुणे पोलिसांनी गुनाट गावातील ग्रामस्थांच्या मदतीने तीन ड्रोन कॅमेरे, श्वान पथकांच्या मदतीने आणि गाडेला ताब्यात घेतलं.

पुणे पोलिसांच्या सायबर टीमने आरोपीच्या मोबाइल नंबरवरून त्याची गुगल सर्च हिस्ट्री तपासली. त्यामध्ये आरोपी गाडे वारंवार अश्लील व्हिडिओ पाहात असल्याचे दिसून आले आहे. त्याने एकाच वर्षात २२ हजार अश्लील व्हिडीओ पाहिल्याचं या तपासातून समोर आलं आहे. त्यानंतर आरोपीच्या गुगल सर्च हिस्टरी पंचनामा करण्यात आला.

### दहशतवादी आणि त्यांना पाठिंबा....

२०० दशलक्ष डॉलर्सची संरक्षण क्रेडिट लाइन मंजूर करण्यात आल्याची घोषणा मोदी यांनी केली. अंगोलासोबत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, अंतराळ तंत्रज्ञानातील अनुभव शेअर केला जाईल. आरोग्यसेवा, हिरे प्रक्रिया, खते आणि महत्त्वपूर्ण खनिजे या क्षेत्रात दोन्ही देशातील संबंध मजबूत करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मोदी यांनी सांगितले.

दहशतवाद हा मानवतेसाठी सर्वात मोठा धोका आहे यावर आमचे एकमत आहे. दहशतवाद्यांवर आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांविरुद्ध ठोस आणि निर्णायक कारवाई करण्यास वचनबद्ध असल्याचे सांगत पंतप्रधान मोदी यांनी दहशतवादाविरुद्धच्या लढाईत अंगोलाने दिलेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अंगोलाला आफ्रिकन युनियनच्या अध्यक्षपदासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. भारताच्या जी २० अध्यक्षपदाच्या काळात आफ्रिकन युनियनला जी २० चे कायमचे सदस्यत्व मिळाले हे अभिमानाची गोष्ट असल्याचेही मोदी म्हणाले.

### अजित पवार- शिंदे...

कोणी सत्कार स्वीकारत असतील तर ती महाराष्ट्राशी बेइमानी आहे. अमित शहांनी महाराष्ट्र तोडण्यासाठी महाराष्ट्राच्या संबंधित असलेले पक्ष तोडले. त्यांच्या पक्षाच्या सत्कारासाठी आम्ही कधीही जाणार नाही, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्राच्या सर्व माजी मुख्यमंत्र्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये उद्धव ठाकरे यांनाही आमंत्रण देण्यात आले आहे. मात्र, ते जाणार नसल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

अजित पवार यांच्या पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम सामाजिक कृतज्ञतेचा आहे, असे आम्ही मानत नाही. हा महाराष्ट्रासोबत गद्दारीचा प्रश्न आहे. ज्यांनी महाराष्ट्राशी बेइमानी केली, आमचे सरकार पाडले, त्यात कृतज्ञता कशी आली? असा प्रश्न संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. शरद पवार या कार्यक्रमाला जायची शक्यता वर्तवली जात आहे, यावरून संजय राऊत यांनी टीका केली आहे.

### भिवंडीत आढळले एकाच कुटूंबातील...

पाहिले. त्यावेळी त्यांना पत्नी आणि तीन मुलींचे मृतदेह घरातील छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. याबाबत माहिती मिळताच भिवंडी शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि घराचा दरवाजा उघडला.

भवंडी शहर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आणि त्यानंतर चौघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी स्व. इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात पाठविले आहेत. घटनास्थळी पोलिसांना महिलेने लिहीलेली एक चिठ्ठी सापडली आहे. त्यात स्वतःच्या मर्जीने करीत असून आत्महत्येस कोणालाही जबाबदार धरू नये, असे लिहीले होते. असे असले तरी या महिलेने मुलींसह आत्महत्या करण्यामागचे कारण अद्याप समजू शकलेले नसून त्याचा तपास पोलिस करीत आहेत. तसेच या चिठ्ठीनुसार महिलेने आत्महत्या केली असली तरी, तिच्या मुलींनी आत्महत्या केली की त्यांची महिलेने हत्या केली, या दिशेने पोलिस तपास करीत आहेत, अशी माहीती पोलीस सुत्रांनी दिली.

### पहेलगाम हल्ल्यात सहभागी...

लक्ष दिले तर काश्मीर प्रगती करू शकणार नाही.'' असे फारुख अब्दुल्ला यांनी म्हटले आहे.

यावेळी भारताने सिंधू पाणी करार स्थगित करण्याच्या घेतलेल्या भूमिकेवरीही फारुख अब्दुल्ला यांनी भाष्य केले. ते म्हणाले, या करारात बऱ्याच काळापासून सुधारणा करणे गरजेचे होते. आपल्या नद्यांच्या पाण्यापासून आपण वंचित आहोत. नद्यांवर जलविद्युत निर्मितीच्या मदतीने हजारो मेगावॅट वीज निर्मिती करता येते. पण, पाकिस्तानच्या परवानगीशिवाय हे करता येत नाही. जम्मूला चिनाब नदीचे पाणी मिळू शकत नाही कारण करारात असे नियम आहेत.

फारुख अब्दुल्ला म्हणाले, भारत हा महात्मा गांधींचा देश आहे, आम्ही पाण्यासंदर्भात पाकिस्तानला निश्चितपणे धमकी दिली आहे. पण त्यांना मारणार नाही. आपण एवढे क्रूर नाही, जेव्हा दोन्ही देशांमध्ये सिंधू पाणी करार झाला तेव्हा जम्मू आणि काश्मीरमधील लोकांना विश्वासात घेतले गेले नाही. यामुळे आजही लोकांना त्रास सहन करावा लागत आहे.

### संपूर्ण महाराष्ट्राला अवकाळी पुन्हा...

नागरिकांना घराबाहेर पडताना धडकी भरेल एवढं तापमान नोंदवला जात असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे . गेल्या चार ते पाच दिवसांपासून सोलापूर मध्ये तापमान ४५ अंशांच्या उंबरठ्यावर आहे .विदर्भात पावसाचा इशारा असला तरी ४२ ते ४५ अंशापर्यंत तापमान टेकलं आहे .मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून कमाल तापमान ४० ते ४५ अंशापर्यंत गेलंय. अनेक भागांमध्ये दुपारच्या वेळी शुकशुकाट झालाय. रस्ते ओस पडले आहेत.

### 'एआय'च्या वापरामुळे...

द्यायला हवा.

हिंदी आणि मराठी चित्रपटातील अभिनेते, अभिनेत्री यांना आपण पूर्वी सेलिब्रिटी समजत होतो. सध्या स्टार्टअप आणि उद्योजकांचे युग आहे. उद्योजक हे नव्या पिढीचे सेलिब्रेटी बनत असल्याचे गुप्ता यांनी सांगितले. सध्या व्यवसायामध्ये महिलांचा वाढता सहभाग हा भारताच्या उद्योजकतेच्या विकासात सकारात्मक पाऊल आहे. सर्व क्षेत्रात महिला पुढे येत असून त्यांचा सहभाग वाढत आहे. महिला उद्योजकांसाठी विविध प्रशिक्षण व निधी शासकीय योजनातून मिळत आहे. मन, बुद्धी आणि वेळ दिला तर आपल्याला कोणत्याही क्षेत्रांमध्ये यश नक्की मिळते, असेही गुप्ता यांनी सांगितले.

मोबाईल आणि सोशल मीडिया वापरासह सर्व क्षेत्रामध्ये 'एआय'चा वापर होणार आहे. 'एआय' वापराने रोजगार जाण्याची भीती नाही, मात्र त्याचा सकारात्मक पद्धतीने स्वीकार करून आपल्या व्यवसायात वापर करायला हवा. विकसित भारताच्या जीडीपीमध्ये नवउद्योजकांचा खूप मोठा वाटा असेल, असे शादी डॉट कॉमचे श्री. मित्तल यांनी सांगितले.

चॅट जीपीटी, गो टू चाही वापर वाढत आहे. कोणत्याही टेक्स्टबाबत सर्व उपलब्ध माहिती मिळते. ॲप बनवायला सोपे असल्याने यामध्येही रोजगाराच्या भरपूर संधी आहेत. चांगली जागा/क्षेत्र () निवडा. चांगल्या कल्पनांची अंमलबजावणी करण्याची क्षमता असेल तर चांगले उद्योजक बनाल. काहीतरी बदल घडवण्यासाठी किंवा समाजासाठी काहीतरी चांगलं करण्याच्या उद्देशाने उद्योगाची सुरुवात करा, महिलांनी उद्योग करण्यासाठी पुढाकार घेऊन पुढे यायला हवे, असेही मित्तल यांनी यावेळी सांगितले.

### केंद्र सरकारकडून पाकिस्तानातून...

अनौपचारिक व्यापार मार्ग देखील विस्कळीत होऊ शकतात आणि आर्थिक दबाव वाढू शकतो. २२ एप्रिल रोजी काश्मीरमध्ये पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या प्राणघातक हल्ल्यामागील एक पाकिस्तानी दहशतवाद्यांपैकी एक, हाशिम मुसा, पाकिस्तानी लष्कराच्या विशेष दलाचा माजी पॅरा कमांडो असल्याचे तपासात समोर आलं आहे. केंद्र सरकारने या हल्ल्यासाठी पाकिस्तानला जबाबदार धरले आणि त्यामागील लोकांना शिक्षा करण्याचे आश्वासन दिले. पाकिस्तानने कोणताही संबंध नाकारला असून भारताने लष्करी कारवाई केल्यास प्रत्युत्तर देईल असा इशारा दिला आहे. गेल्या १० दिवसांपासून नियंत्रण रेषेवर युद्धबंदीचे उल्लंघन होत आहे.

भारताने पाकिस्तानविरुद्ध आधीच अनेक पावले उचलली आहेत, राजनैतिक संबंध कमी केले आहेत. पाकिस्तानविरुद्धच्या उपाययोजनांमध्ये सिंधू पाणी करार निलंबित आणि पाकिस्तानकडून येणाऱ्या विमानांसाठी त्याचे हवाई क्षेत्र बंद करणे समाविष्ट आहे. प्रत्युत्तरादाखल, पाकिस्तानने १९७२ चा सिमला करार रद्द करणे, भारतीय विमानांसाठी त्यांचे हवाई क्षेत्र बंद करणे, वाघा सीमा क्रॉसिंग बंद करणे, व्यापार थांबवणे आणि सिंधू कराराअंतर्गत पाणी वळवण्याचा भारताचा कोणताही प्रयत्न युद्धाचा प्रयत्न म्हणून पाहिला जाईल असा इशारा दिला आहे.

# आनंदजी कल्याणजी जैन मंदिर ट्रस्ट तर्फे त्रिदिवसीय वर्षीतप पारना महोत्सवची सांगता

छत्रपती संभाजीनगर दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– प्रवर समिति कार्यवाहक, महा मांगलिक प्रदाता,संघ उपकारी गच्छाधीपति प. पु.ग.आ.भ. श्रीमद विजय अभयदेवसूरीजी महाराजा,मार्गदर्शक प.पु.आ.भ. श्रीमद,मोक्षरत्नसुरिश्वरजी म.सा.च्या आशिर्वादाने प.पू.सा.श्री. अर्क्रेंदुश्रीजी म.सा.,प.पू.सा. श्री.मुक्तिरसाश्रीजी म.सा., प.पू. सा.श्री. शासनज्योतिश्रीजी म.सा. यांच्या सानिध्यात वर्षीतप पारना त्रिदिवसीय महोत्सव संपन्न विमलनाथ मंदिर येथुन पूज्य गुरु भगवंत व् वर्षीतप तपस्वींची शोभा यात्रा श्री गोडिजी पार्श्वनाथ जैन मंदिर पर्यंत काढण्यात आली. पश्यात श्री आदिनाथ प्रभु पंचकल्याणक पूजा महिला मंडल तर्फे करण्यात आली. तदनतर दि.२९. सकाळी ०८.३० वा. शिर धर्मेन्द्रभाई पंडित (मुंबई) यानी तपवंदानावली हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाचा लाभ मातोश्री प्यारी बेन गणेशमल लुंकड़ परिवाराने घेतला.

दु.१२.३० वा. श्री सिध्द चक्र महापूजन चे आयोजन मोमाया परिवारा तर्फे करण्यात आले होते. या प्रसंगी विधिकार राजुभाई शाह ( मलकापुर ), संगीतकार दर्शित गादीया व शेकडो भाविक उपस्थित होते. अक्षय तृतीया दि. ३० बुधवार रोजी सकाळी ७.०० वा. श्री आदिनाथ भगवंताची अभिषेक, पूजा, आरती करण्यात आली ७.३० वा. नवकारशी स.८.३० वा. श्री अभयमुक्ति एक्टिव ग्रुप तर्फे संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात ग्रुप च्या ५० सदस्यांनी अदीनाथ भगवंताचा पारना प्रंसग प्रस्तुत केली.सकाळी १०.०० वा. प.पू.सा.श्री. मुक्तिरसाश्रीजी म.सा. च्या प्रशिष्या, प.पू.सा.श्री. परमार्थरसाश्रीजी म.सा. व प.पू.सा. श्री. तत्वार्थप्रियाश्रीजी म.सा. तसेच सुश्रावक हर्षल अनिल मोमाया, सुश्राविका श्रीमती सरोज बेन, सौ. अर्चना बेन नरेन्द्र गेलडा, सारिका बेन प्रशांतभाई बोरा यांचा वर्षीतप पारना करवण्यात आला या कार्यक्रमात श्री श्रेयांश कुमार बनुन मातोश्री लीलावती बेन जेठाबाई मोमाया, श्री चंद्रबेन गुलाबचंद खोना, शौर्य, निशांत, लीना, यश तथा लोढाया परिवार तपस्विना पारना करवण्याचा मान मीळवला. श्री गुरुपूजन चा मान एक सदग्रस्त परिवार हस्ते रमेश भाई मनमंदिर परिवाराने मीळवला. तसेच गुरु भगवंताना शाल ओढ़वन्याचा मान श्री डॉ.उमेशकुमार रूपचंद तातेड परिवाराने श्री.पु.सा.श्री एवं तपस्विना अक्षतने स्वागत करण्याचा मान मातोश्री लीलावती बेन जेठाबाई मोमाया श्री चंद्रबेन गुलाबचंद खोना, शौर्य, निशांत, लीना, यश तथा लोढाया परिवार मीळवला. तपस्विचा बहुमान करण्याचा मान मातोश्री सुशीला देवी चैनकरन संचेती परिवाराणे मीळवला ११.३० ते २.०० वाजे पर्यंत महाप्रसादी दु ३.०० वाजता तपस्वीची सांजी ( भावगीत ) सह कार्यक्रम म. सा.च्या सांसारिक परिवारा तर्फे संपन्न करण्यात आला उपरोक्त कार्यक्रमास मंत्री अतुल सावे,अनिल मक्रीये ,विनोद लोडाया,निलेश बाबरीया,डॉ. जिन्दानी ,महेंद्र जैन,राहुल डोसी,आनंद संचेती,डॉ तातेड,रवि मुगदीया,शांतिकाका,हंसमुख जैन,संजय शहा,गिरीष ललवानी,राजु सुराणा,भरत देवडा,आषिश जैन,सतिष संचेती,अशोक गेलडा,नरेन्द्र गेलडा,अनिलकुमार संचेती, मिठालाल कांकरीया,हीरालाल भंडारी सह शेकडो भाविक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्या साठी श्री आनंदजी कल्यानजी जैन श्वेताम्बर मंदिर ट्रस्ट व अभय मांगलिक मंडल,महीला मङ्ळ तर्फे परीश्रम घेण्यात आले.



## आंतरजातीय विवाह केलेल्या १४० जोडप्यांना अनुदान वितरीत

छत्रपती संभाजीनगर दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य देण्याची योजना समाजकल्याण विभागामार्फत चालविली जाते. जिल्ह्यात असे १४० लाभार्थी जोडपे होते. त्यांना प्रति जोडपे ५० हजार रुपये या प्रमाणे ७० लाख रुपयांचा लाभ वितरीत करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी साहेबराव चव्हाण यांनी दिली आहे. समाज कल्याण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनेत जिल्ह्यात १४० लाभार्थी पात्र होते. त्यांना लाभ देण्यासाठी ७० लक्ष रुपयांची तरतूद प्राप्त झाली होती. ७२ लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली होती. मात्र ५६ लाभार्थ्यांचे ॲप्रुव्हल दि.३१ मार्च रोजी कालबाह्य झाले होते व १२ लाभार्थ्यांना बँकेकडून ॲप्रुव्हल मिळाले नसल्याने ६८ लाभार्थ्यांच्या लाभाची तरतूद शासनास परत गेली होती. तथापि, प्रादेशीक उपायुक्त दीपक खरात, आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांना याबाबत समाज कल्याण अधिकारी साहेबराव चव्हाण यांनी माहिती दिली. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आदेश निर्गमित करुन उर्वरीत ६८ लाभार्थ्यांचे अनुदान ३४ लाख रुपये तात्काळ पुन्हा अनुदान वितरीत करण्यात आले. आता या सर्व १४० लाभार्थ्यांना लाभाचे वितरण झाले आहे.

## वर्षभरात वीजचोरीची ४४२५ प्रकरणे उघडकीस, ३५० जणांवर गुन्हे दाखल

छत्रपती संभाजीनगर दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलात गेल्या वर्षभरात वीजचोरीची ४४२५ प्रकरणे उघडकीस आली आहेत. यात ग्राहकांनी ७ कोटी ८७ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे आढळून आले आहे. या सर्वांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. ३५० प्रकरणांत वीजचोरी करणाऱ्यांवर पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी परिमंडलातील छत्रपती संभाजीनगर व जालना या दोन्ही जिल्ह्यांत वीजचोरीविरोधात नियमित कारवायांबरोबरच प्रत्येक महिन्यात विशेष मोहीम राबवण्याचे आदेश सर्व क्षेत्रीय अभियंते व कर्मचाऱ्यांना दिलेले आहेत. ज्या विद्युत वाहिनीवर वीजगळतीचे प्रमाण अधिक आहे, त्या भागात इतर भागातील कर्मचाऱ्यांनीही भाग घेऊन एकाचवेळी कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. त्यानुसार परिमंडलातील प्रत्येक शाखेत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सलग काही दिवस केवळ वीजचोरीविरोधातील धडक मोहीम राबवण्यात येत आहे.

आकडेबहाद्दरांसह मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करणाऱ्यांवरही महावितरणचे लक्ष आहे. वीजचोरीचा संशय असलेले मीटर ताब्यात घेऊन त्याची महावितरणच्या मीटर टेस्टिंग लॅबमध्ये तपासणी केली जाते. त्यात काही फेरफार केल्याचे आढळल्यास ग्राहकाने जोडलेल्या वीजभारानुसार वीजचोरीचे निर्धारित बिल दिले जाते. तसेच दंड (कंपाउंडिंग चार्जेस) आकारला जातो. वीजचोरीचे निर्धारित बिल व दंडाची रक्कम भरण्यासाठी ग्राहकाला मुदत दिली जाते. तथापि, विहित मुदतीत ग्राहकाने बिल व दंड न भरल्यास त्याच्यावर विद्युत कायद्यातील तरतुदीनुसार पोलिसांत गुन्हा नोंदविला जातो.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलात एप्रिल-२०२४ ते मार्च-२०२५ या आर्थिक वर्षात मोठ्या संख्येने वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली. यात छत्रपती संभाजीनगर शहर मंडलात ६५९, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलात २७३४ तर जालना मंडलात वीजचोरीची १०३२ प्रकरणे उघडकीस आली. एकूण ४४२५ प्रकरणांत ग्राहकांना ७ कोटी ८७ लाख रुपयांच्या वीजचोरीची बिले देण्यात आली. ज्या ग्राहकांनी वीजचोरीची बिले भरलेली नाहीत, त्यांच्यावर पोलिसांत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया महावितरणतर्फे सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंत छत्रपती संभाजीनगर शहर मंडलात २, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलात १६६ तर जालना मंडलात १८२ प्रकरणांत वीजचोरांवर पोलिस ठाण्यांत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. वीजचोरीविरोधातील धडक मोहीम यापुढेही सुरू राहणार आहे. नागरिकांनी अधिकृत जोडणी घेऊनच विजेचा वापर करावा, असे आवाहन महावितरणने केले आहे. महावितरणच्या वतीने वीजचोरीची माहिती देणाऱ्यांना रोख रक्कम बक्षीस म्हणून देण्यात येते. वीजचोरीला आळा बसावा यासाठी महावितरणतर्फे वीजचोरीविरुद्ध सातत्याने मोहिमा राबविण्यात येतात. याउपरही काही वीजग्राहक नवनवीन युक्त्या वापरून वीजचोरी करतात. अशा वीजचोरीची माहिती देणाऱ्यांना वीजचोरीच्या निर्धारित रकमेच्या दहा टक्के रक्कम बक्षीस म्हणून देण्यात येते. वीजचोरी करणाऱ्या ग्राहकाने तडजोड रकमेसह वीजचोरीची संपूर्ण रक्कम भरल्यानंतरच बक्षीस देण्यात येते. वीजचोरीची माहिती बंद पाकिटात लेखी स्वरूपात समक्ष कार्यकारी अभियंता यांना देऊन त्यांची पोच नागरिकांनी घ्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येते. दिलेल्या माहितीवर तात्काळ कारवाई व तपासणी करण्याचे आदेश सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

> वीजचोरी हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असून या गुन्ह्यात तीन वर्षे कारावास किंवा दंड अथवा या दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. नागरिकांनी ही बाब लक्षात घेऊन कोणत्याही प्रकारे विजेचा चोरटा किंवा अनधिकृत वापर कटाक्षाने टाळावा. अधिकृत वीजजोडणी घेऊनच विजेचा वापर करावा.
>
> **– पवनकुमार कछोट,**
> मुख्य अभियंता,
> महावितरण, छत्रपती संभाजीनगर परिमंडल

# बीड मधील तीन केंद्राना कुलगुरूंची ‘सरप्राईज व्हिजीट’

## पहिल्याच दिवशी ३६ कॉपीबहादर आढळले, या विद्यार्थ्यांचा संपूर्ण परफॉर्मन्स रद्द करण्याचे आदेश

छत्रपती संभाजीनगर दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी पदव्युत्तर परीक्षेत पहिल्याच दिवशी मंगळवारी बीड शहरातील तीन परीक्षा केंद्राना ’सरप्राईज व्हिजीट’ दिली. या ठिकाणी ३६ कॉपीबहादर आढळले असून त्यांचा ’संपूर्ण परफॉर्मन्स रद्द’ (डब्ल्यूपीसी) करण्याचे आदेश मा.कुलगुरू यांनी दिले आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा २९ एप्रिल पासून सुरु झाल्या आहेत. चार जिल्हयातील ८० केंद्रावर सुमारे ३० हजार विद्यार्थी परीक्षा देत आहेत. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली यापुर्वीच पदवी अभ्यासक्रमांच्या परीक्षा ८ एप्रिल पासून सुरळीतपणे सुरु झाल्या. या परीक्षा केंद्रानाही मा. कुलगुरू यांनी अकस्मात भेटी देऊन कॉपीबहाद्दर पकडले. तसेच परीक्षा केंद्रातील त्रुटी संदर्भात कारवाई कारण्याचे आदेश दिले. यानंतर दुस-या टप्प्यात एम.ए, एम.कॉम, एम.एस्सी, बी.एड, बीपीएड आदी सर्व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा २९ एप्रिलपासून सुरु होत झाल्या. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाप्रमाणे (एनईपी-२०२३) या परीक्षा घेण्यात येत आहेत. यामध्ये वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा ५ हजार ५४८, मानव्यविद्या शाखा - ७ हजार २०१, आंतरविद्या शाखा - २ हजार ११२ तर विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा सर्वाधिक १३ हजार ५८ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. या सर्व अभ्यासक्रमांचे एकुण २९ हजार ९६९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यासाठी चार जिल्हयात मिळून ३२ परीक्षा केंद्र आहेत. तर ३२ भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. परीक्षा व मुल्यमापन मंडळ संचालक डॉ.भारती गवळी, उपकुलसचिव डॉ.विष्णु कऱ्हाळे, सहाय्यक कुलसचिव भगवान फड, राजेंद्र गांगुर्डे, महेंद्र पैठणे आदी परीक्षेसाठी प्रयत्नशील आहेत.

दरम्यान, पदव्यूत्तर परीक्षा सुरु झाल्यावर मा.कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांनी पहिल्याच दिवशी मंगळवारी ( दि.२९ ) बीड शहरातील बलभीम महाविद्यालय, केएसके महाविद्यालय व आदित्य व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय अशा तीन ठिकाणी सकाळच्या सत्रात भेट दिली. या तीनही ठिकाणी अनुक्रमे १५, १५ व सहा असे ३६ विद्यार्थी नकला करतांना आढळून आले. या विद्यार्थ्यांचा उत्तरपत्रिका घेण्यात आली. तसेच संपुर्ण परफॉर्मन्स रद्द करण्याचे आदेशही मा. कुलगुरु यांनी दिले. यावेळी भरारी पथकातील डॉ.सतीश दांडगे व डॉ.भास्कर साठे हेही उपस्थित होते. पदव्यूत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी बलभिम महाविद्यालयात ४२८, केएसके महाविद्यालयात १७८ तर आदित्य व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात ३३७ असे एकुण १ हजार ३ विद्यार्थी परीक्षा देत आहेत.

पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा केंद्रावर विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे व्यवस्था करण्यात आल्याचे आढळले नाही. तसेच या केंद्रावर विद्यार्थी सर्वात वरच्या मजल्यावर बसविण्यात आले. ’स्ट्राँग रुम’ मध्ये सीसीटिव्ही, झेरॉक्स मशीन नसल्याचे दिसून आले. याबद्दल मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी संबंधित केंद्र प्रमुखाला विचारणा केली. या भेटीच्या वेळेपर्यंत केएसके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर तसेच सहकेंद्र प्रमुख हे महाविद्यालयात आले नव्हते. तर बलभीम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष उंदरे, केंद्रप्रमुख व सहकेंद्रप्रमुख असे उपस्थिती होते. तर आदित्य व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयांचे संपूर्ण केंद्रच विस्कळीत होते. विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे बैठक व्यवस्था करण्याचे आदेशही मा.कुलगुरु यांनी दिले. या संदर्भात परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ.भारती गवळी यांना विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे कारवाई करण्याची सूचनाही . कुलगुरु यांनी केली आहे.

## भगवान परशुराम जयंतीनिमित्त पैठण येथे आतषबाजीसह भव्य शोभायात्रा, महाप्रसाद

पैठण दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– शहरातील गागाभट्ट चौक येथून राजूनाना भुमरे, मा. नगराध्यक्ष सुरज लोळगे, दत्ताभाऊ गोर्डे, सोमनाथ परदेशी, महेश जोशी, आप्पासाहेब गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत फटाक्यांच्या आतषबाजीत भगवान परशुरामाचा जयजयकार करत शोभायात्रेला मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली.

शोभायात्रा गागाभट्ट चौक, बाहेरील नाथ मंदिर, खंडोबा चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, महाराणा प्रताप चौक, शिवाजी महाराज स्मारक, भाजी मार्केट, सुतारपार गल्ली, नवग्रह मंदिर, गावातील नाथ मंदिर मार्गे अमळनेरकर महाराज यांच्या मठात शोभायात्रेचा समारोप करण्यात आला.

शोभायात्रा समयी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितुभाऊ परदेशी, सुरज लोळगे, मनोज वैद्य यांच्यातर्फे थंड पेयांचे वाटप करण्यात आले. भगवान परशुराम जन्म उत्सव शोभायात्रेत समितीचे अध्यक्ष योगेश धर्माधिकारी, उपाध्यक्ष विशाल पोहेकर, यश कुलकर्णी, सचिव परीक्षेत गोसावी, सचिन कावसानकर, सहसचिव कैलास देशमुख, सखाराम भागवत, कार्याध्यक्ष - संतोष जोशी, रवी जोशी, ओंकार जोशी, सहकार्याध्यक्ष गणेश कुलकर्णी आदी सहभागी होते.

अमळनेरकर महाराज यांच्या मठात भगवान परशुरामाची आरती करून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेत भगवान परशुराम यांची वेशभूषा धारण केलेला मुलगा शोभायात्रेचे आकर्षण ठरत होता. यादरम्यान मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते.

## जैन मंदिर जोहरीवाडा येथे त्रिदिवसीय वर्षीतप पारना महोत्सवचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– आनंदजी कल्यानजी जैन मंदिर जोहरीवाडा तर्फे त्रिदिवसीय वर्षीतप पारना महोत्सव चे आयोजन प्रवर समिति कार्यवाहक, महा मांगलिक प्रदाता,संघ उपकारी गच्छाधीपति प. पु.ग.आ.भ. श्रीमद विजय अभयदेवसूरीजी महाराजा,मार्गदर्शक प.पु.आ.भ. श्रीमद,मोक्षरत्नसुरिश्वरजी म.सा.च्या आशिर्वादाने प.पू.सा.श्री.अर्क्रेंदुश्रीजी म. सा.,प.पू.सा.श्री.मुक्तिरसाश्रीजी म.सा., प.पू.सा.श्री. शासनज्योतिश्रीजी म.सा. यांच्या सानिध्यात वर्षीतप पारना महोत्सव चे आयोजन सोमवार दि.२८.०४.२०२५ रोजी श्री विमलनाथ मंदिर वरुण पूज्य गुरु भगवंत व् वर्षीतप तपस्वींची शोभा यात्रा श्री गोडिजी पार्श्वनाथ जैन मंदिर पर्यंत काढण्यात आली. पश्यात श्री आदिनाथ प्रभु पंचकल्याणक पूजा महिला मंडल तर्फे करण्यात आली. दि.२९.०४.२०२५ सकाळी ०८.३० वा. शिर धर्मेन्द्रभाई पंडित ( मुंबई ) यानी तपवंदानावली हा कार्यक्रम सदर केला. या कार्यक्रमाचा लाभ मातोश्री प्यारी बेन गणेशमल लुंकड़ परिवाराने घेतला.

या कार्यक्रमात श्री श्रेयांश कुमार बनुन मातोश्री लीलावती बेन जेठाबाई मोमाया, श्री चंद्रबेन गुलाबचंद खोना, शौर्य, निशांत, लीना, यश तथा लोढाया परिवार तपस्विना पारना करवण्याचा मान मीळवला. श्री गुरुपूजन चा मान एक सदग्रस्त परिवार हस्ते रमेश भाई मनमंदिर परिवाराने मीळवला. तसेच गुरु भगवंताना शाल ओढ़वन्याचा मान श्री डॉ.उमेशकुमार रूपचंद तातेड परिवाराने श्री.पु.सा.श्री एवं तपस्विना अक्षतने स्वागत करण्याचा मान मातोश्री लीलावती बेन जेठाबाई मोमाया श्री चंद्रबेन गुलाबचंद खोना, शौर्य, निशांत, लीना, यश तथा लोढाया परिवार मीळवला. तपस्विचा बहुमान करण्याचा मान मातोश्री सुशीला देवी चैनकरन संचेती परिवाराणे मीळवला दु.१२.३० वा. श्री चक्र महापूजन चे आयोजन मोमाया परिवारा तर्फे करण्यात आले होते. या प्रसंगी विधिकार राजुभाई शाह ( मलकापुर ), संगीतकार दर्शित गादीया व शेकडो भाविक उपस्थित होते.



अक्षय तृतीया दि. ३०.०४.२०२५, बुधवार रोजी सकाळी ७.०० वा. श्री आदिनाथ भगवंताचा अभिषेक, पूजा, आरती चे आयोजन ७.३० वा. नवकारशी स.८.३० वा. श्री अभयमुक्ति एक्टिव ग्रुप तर्फे संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सकाळी १०.०० वा. प.पू.सा.श्री. मुक्तिरसाश्रीजी म.सा. च्या प्रशिष्या, प.पू. सा.श्री. परमार्थरसाश्रीजी म.सा. व प.पू. सा.श्री. तत्वार्थप्रियाश्रीजी म.सा. तसेच सुश्रावक हर्षल अनिल मोमाया, सुश्राविका श्रीमती सरोज बेन, सौ.अर्चना बेन नरेन्द्र गेलडा, सारिका बेन प्रशांतभाई बोरा यांचा वर्षीतप पारना ११.३० ते २.०० वाजे पर्यंत महाप्रसादी दु ३.०० वाजता तपस्वीची सांजी ( भावगीत ) सह कार्यक्रम म.सा.च्या सांसारिक परिवारा तर्फे आयोजित करण्यात आला आहे.

उपरोक्त कार्यक्रमास जास्तीत जास्त भाविकानी उपस्थित रहावे असे आव्हान ! श्री आनंदजी कल्यानजी जैन श्वेताम्बर मंदिर ट्रस्ट व अभय मांगलिक मंडल तर्फे करण्यात आले आहे.

## वृद्धाला एटीएममध्ये गंडवून १.६० लाखांचा फसवणूक

छत्रपती संभाजीनगर दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)– सायबर गुन्हेगारांनी आता वृद्ध नागरिकांना टार्गेट करण्यासाठी नवी शक्कल वापरायला सुरुवात केली आहे. एटीएममध्ये कार्ड अडकवून ग्राहक सेवा क्रमांक म्हणून स्वतःचा नंबर लावून फसवणुकीचा प्रकार करण्यात आला. या पद्धतीने एका ७० वर्षीय वृद्धाचा १ लाख ६० हजार रुपयांचा अपहार करण्यात आला. ही घटना २२ एप्रिल रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास बीड बायपास परिसरात घडली. याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

तक्रारदार सुनील देशपांडे (वय ७०) हे बायपास परिसरातील महानुभाव आश्रमाजवळील एटीएममध्ये गेले होते. त्यांनी कार्ड मशीनमध्ये टाकताच ते अडकले. काही वेळ वाट पाहूनही कार्ड न निघाल्याने ते अस्वस्थ झाले. त्यांनी सेंटरच्या भिंतीवर लिहिलेल्या कस्टमर केअर क्रमांकावर संपर्क साधला. समोरून फोनवर असलेल्या व्यक्तीने आवाज स्पष्ट न ऐकू येत असल्याचे सांगून देशपांडे यांना बाहेर येऊन बोलण्याचा सल्ला दिला.

देशपांडे फोनवर बोलत बाहेर आले असताना एका अज्ञात व्यक्तीने एटीएममध्ये प्रवेश केला. फोन होल्डवर ठेवून त्या व्यक्तीने देशपांडे यांना पुन्हा मशीनमध्ये जाण्यास सांगितले. त्यांना कॅन्सल बटन दाबायला सांगितले आणि दुसऱ्या हाताने एटीएम पिन टाकण्यास सांगितले. यानंतर एका विशिष्ट बटनावर दोनदा दाबण्यास सांगितले, पण कोणते बटन होते याचे नक्की लक्षात राहिले नाही. नंतर कार्ड मशीनमधून बाहेर आले.

यानंतर फोनवरील व्यक्तीने त्यांना कार्ड पुढील चार तासांसाठी ब्लॉक झाल्याचे सांगितले. देशपांडे घरी परतले. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या मोबाइलवर २०-२० हजार रुपयांचे आठ व्यवहार झाले असल्याचे मेसेज आले, म्हणजेच एकूण १.६० लाख रुपये गायब झाले होते. प्रकार लक्षात येताच त्यांनी तत्काळ सायबर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक नंदकुमार भंडारे करत आहेत.

दैनिक ग्लोबल भारत

dailyglobalbharat@gmail.com www.globalbharatlive.com



# पाणी पेटलं! तहानलेल्या गावांसाठी घाटगे पाटलांचा एल्गार, अधिकाऱ्यांची बोलती बंद!

## गोदावरी नदीवरील कॅनॉल दरवाजे उघडून शेतकऱ्यांसाठी सोडले पाणी

अंबड दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- जायकवाडीच्या पाण्यावरून पेटलेल्या असंतोषाचा ज्वालामुखी शुक्रवारी उसळला! समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन आणि भाजप नेते सतीश घाटगे पाटील यांनी तहानलेल्या गावांसाठी आक्रमक भूमिका घेत थेट गोदावरी नदीच्या कॅनॉलचे दरवाजे उघडले. शेकडो शेतकऱ्यांच्या साथीनं घाटगे पाटलांनी गुळज आणि तळनेवाडी येथील कॅनॉलचे अडथळे झुगारून लावले आणि हक्काचं पाणी गोदावरीच्या पात्रात सोडलं.

अंबड-घनसावंगी तालुक्यात भीषण पाणीटंचाई असताना, पिण्याच्या पाण्यासाठी आणि मुक्या जनावरांसाठी त्राहिमाम असताना पाटबंधारे विभागाचे अधिकारी मात्र डोळेझाक करत होते. जायकवाडी धरणात पुरेसा साठा असूनही गोदाकाठच्या गावांना कॅनॉलद्वारे पाणी सोडण्यात चालढकल केली जात होती. या प्रशासकीय उदासिनतेमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला होता. अखेरीस, सतीश घाटगे पाटील यांनी या असंतोषाचं नेतृत्व करत थेट मैदानात उतरण्याचा निर्धार केला. शुक्रवारी, त्यांनी शेकडो शेतकऱ्यांना एकत्र करत गोदावरी नदीच्या उजव्या कालव्यावरील गुळज आणि तळनेवाडी कॅनॉलकडे कूच केली. संतप्त शेतकऱ्यांच्या रेट्यापुढे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांचे सारे प्रयत्न निष्फळ ठरले. घाटगे पाटील आणि शेतकऱ्यांनी स्वतः कॅनॉलचे दरवाजे उघडले आणि अडवलेलं पाणी अखेर गोदावरीच्या दिशेने मार्गस्थ झालं. या निर्णायक क्षणी शेतकऱ्यांनी एकच जल्लोष केला आणि घाटगे पाटलांच्या हिमतीला सलाम केला. या आंदोलनात भाजपा तालुका प्रमुख शिवाजी मोरे, आसेफ कुरेशी, दत्ता लोने यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

घनसावंगी -अंबड तालुक्यातील दुष्काळी गावांची परिस्थिती लक्षात घेऊन पाट बंधारे विभागाने लवकरच हे पाणी सोडायला पाहिजे होत. परंतु पाट बंधारे विभागाच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांना वेठीस धरण्यात येत आहे. आम्ही सरकारला बदनाम होऊ देणार नाही. त्यामुळे शेतकरी हितासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे. येत्या दोन दिवसात मंगरूळ , शिवनगाव, जोग्लादेवी बंधाऱ्यात एस्केप गेट उघडून पिण्यासाठी पाणी न सोडल्यास तिथले एस्केप गेट उघडून आम्ही पाणी खुले करणार आहोत.

**-सतीश घाटगे पाटील,**
भाजपा नेते तथा चेअरमन समृद्धी शुगर्स

### अधिकाऱ्यांची झाली बोलती बंद!

कॅनॉलचे दरवाजे उघडले जात असताना, धावतपळत आलेल्या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतीश घाटगे पाटील यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. शेतकऱ्यांची व्यथा आणि प्रशासनाची निगरगठ्ठ भूमिका त्यांनी स्पष्ट शब्दांत मांडली, ज्यामुळे अधिकाऱ्यांची बोलती बंद झाली. संतप्त शेतकऱ्यांनीही अधिकाऱ्यांवर आपला रोष व्यक्त केला. ''धरणात पाणी असूनही जर आमच्या शेतकऱ्यांच्या जनावरांना प्यायला पाणी मिळत नसेल, तर या कॅनॉलच्या पाण्याचा काय उपयोग? अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकरी आणि गावकरी पाण्यासाठी तडफडत आहेत. म्हणूनच आम्हाला हे पाऊल उचलावे लागले,'' असे खडे बोल घाटगे पाटील यांनी सुनावले.



# सह्याद्री हॉस्पिटलमध्ये आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा शुभारंभ

## जास्तीत जास्त गरजूंनी योजनेचा लाभ घ्यावा-आ. संतोष दानवे

जालना दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- जालना शहरातील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी भोकरदनचे आमदार संतोष दानवे यांच्या हस्ते आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा एकत्रित शुभारंभ करण्यात आला.



या कार्यक्रमास भाजपा जालना जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. विजय भुतेकर, हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रताप घोडके, आरोग्यमित्र निखिल मगर, अमर उढान, तनुज घोडके आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी शुभेच्छापर बोलताना आ. संतोष दानवे म्हणाले की, आज सह्याद्री हॉस्पिटलमध्ये आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा एकत्रित शुभारंभ होत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या या योजनांमुळे गरजू, गोरगरीब जनतेला मोठा आधार मिळणार आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. गरीब कुटुंबांना केवळ आर्थिक अडचणीमुळे योग्य उपचारांपासून वंचित राहावे लागते, या योजनेमुळे हजारो कुटुंबांना वर्षाकाठी पाच लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे, ही खरोखरच एक मोठी क्रांती आहे.

या योजनांचा जास्तीत जास्त गरजू लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. प्रताप घोडके म्हणाले की, या योजनेअंतर्गत गरीब व गरजू रुग्णांना वर्षातून प्रत्येकी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य सेवा मिळणार आहे. यात १३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया व उपचारांचा समावेश असून, नागरिकांना कोणतीही आर्थिक अडचण न होता आधुनिक वैद्यकीय सेवा मिळणार आहे. योजनेच्या पात्रतेसाठी आयुष्मान कार्ड, रेशन कार्ड,आधार कार्ड ही कागदपत्रे आवश्यक असून, ही सेवा 'विकसित भारत - निरोगी भारत' या संकल्पनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य लोकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे डॉ. प्रताप घोडके यांनी सांगितले.

# महाकाल, पद्मनाभ स्वामींच्या नेत्रदीपक देखाव्यांनी जालनेकर मंत्रमुग्ध, भगवान परशुराम युवा दलाचा दणदणाट

जालना दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- येथील भगवान परशुराम युवा दलाच्या वतीने मंगळवारी भगवान परशुरामांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणुक काढुन त्यात सजीव देखाव्यांचा समावेश केल्याने जालनेकरांच्या डोळ्याचे पारणे फिटले. पद्मनाभ स्वामींच्या देखाव्यासह संगमनेर येथील महाकाल अघोरी यांचा सजीव देखावा पाहण्यासाठी ठिकठिकाणी गर्दी जमली होती.



जुना जालना भागातील कचेरी रोड येथील संस्थान श्री बालाजी मंदिर येथून भगवान परशुराम युवा दलाच्या मिरवणुकीस अत्यंत उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. प्रारंभी सायंकाळी बालाजी मंदिराजवळच पद्मनाभ स्वामी आणि महाकाल अघोरी मंडळाच्या संगमनेर येथील कलाकारांनी आपली रोमहर्षक आणि तेवढीच मनाचा ठाव चुकविणारे देखावे सादर करून टाळ्या मिळविल्या. या मिरवणुकीत मोठ्या नंदीवर महादेवाचे आसनस्थ होणे तसेच वीर हनुमानजींच्या उपस्थितीत सजीव देखावा तसेच अन्य चित्त थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली होती. या शोभायात्रेमध्ये मोठ्या प्रमाणावर युवक-युवतींचा समावेश लक्षणीय दिसुन आला. जय परशुरामच्या घोषणांनी परिसर दणाणुन गेला होता. ही मिरवणुक यशस्वी करण्यासाठी युवा दलाचे रवी जपे, अमोल देशमुख, अमीत कुलकर्णी, सुमीत कुलकर्णी, गणेश लोखंडे, संकेत मोहिते, कृष्णा दंडे, प्रणव निर्खी, प्रतीक कुलकर्णी, अनुराग संगमुळे, अजिंक्य देशमुख, ऋगवेद कुलकर्णी, वेदांत कुलकर्णी, अभि रणनवरे, आकाश क्षिरसागर, सुप्रिया कुलकर्णी, कल्याणी कुलकर्णी, अनिमेश पांडव, चैतन्य नाईक, व्यंकटेश देशमुख, श्रीनिवास देशमुख यांच्यासह अन्य युवक-युवतींनी मिरवणुकीत सहभाग नोंदविला होता. या मिरवणुकीचे जागो-जागी सजीव देखावे पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. मिरवणुकीची सांगता मंमादेवीची महाआरती करून करण्यात आली. सोबत असलेल्या डीजेमुळेही वातावरणात एक प्रकारचा उत्साह दिसून आला.

# जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

जालना दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- महाराष्ट्र दिनाच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, सरिता सुत्रावे, मनिषा दांडगे, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी, जिल्हा कोषागार अधिकारी श्री. पुंडगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लॉ.नरेंद्र मोदी यांना उत्कृष्ट अध्यक्ष रजत पुरस्कार

जालना दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- लॉयन्स क्लब ऑफ जालना रॅपिड क्लबचे अध्यक्ष लॉ. नरेंद्र मोदी यांना क्लबतर्फे राबविण्यात आलेल्या अनाथ बालके, विद्यार्थी, गोर-गरिब, गरजवंत महिलांना शिलाई मशीन वाटप, मोफत भोजन व्यवस्था, वृक्षसंवर्धन, अशा विविध समाज उपयोगी उपक्रमांची दखल घेत लॉयन्स प्रांत थ्री. टू.थ्री.फोर. एच.टू.अंतर्गत एकदंत विभागातील सर्वोत्कृष्ट अध्यक्षतेच्या रजत पुरस्काराने गौरविण्यात आले.

हॉटेल अमित येथे मंगळवारी ( ता. २९) झालेल्या कार्यक्रमात विभागीय अध्यक्ष लॉ. संजीवकुमार गुप्ता, माजी प्रांतपाल लॉ. विजयकुमार बगडिया,माजी प्रांतपाल लॉ. पुरुषोत्तम जयपुरिया यांच्या हस्ते पुरस्कार देऊन लॉ. नरेंद्र मोदी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी लॉयन्स जालना गोल्डचे अध्यक्ष लॉ. अशोक मिश्रा,लॉ.सुभाषचंद्र देवीदान, दीपक मोदी यांची प्रमुख उपस्थिती होती.





या पुर्वी सुद्धा लॉ. नरेंद्र मोदी यांना अंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.या प्रसंगी सत्कारास उत्तर देताना लॉ. नरेंद्र मोदी यांनी सांगितले की ,स्व. धनराज मुथा,स्व.प्रेमराज मुथा, स्व. अनराज मुथा यांची प्रेरणा आणि संस्कारामुळे आपण समाजसेवेकडे वळलो. सीड्स असोसिएशन, रेल्वे सल्लागार समिती सदस्य, जालना सिव्हिल क्लब, भारतीय जैन संघटना, या संस्था, संघटनांमध्ये महत्त्वपूर्ण पदे भूषविली.

सध्या ओमप्रकाश देवडा मल्टिस्टेट हिंगोली बँक जालना-छत्रपती संभाजी नगर चे पालक संचालक, जैन भवन चे उपाध्यक्ष म्हणून लॉ.नरेंद्र मोदी हे यशस्वी पणे जवाबदारी सांभाळत आहेत. लॉयन्स क्लब ऑफ जालना रॅपिड तर्फे अनाथालयांमध्ये बालकांना शालेय तसेच परीक्षेसाठी साहित्य, मिठाई, खाऊ, गरजवंत महिलांना शिलाई मशीन वाटप ,जैन श्वेतांबर मंदिर येथे चार रविवारी मोफत भोजन व्यवस्था ,दिवाळी सणांचे औचित्य साधून गोर-गरीब व गरजवंतांना कपडे, मिठाई वाटप, महिला व बाल रुग्णालयातील परिचारिका ,आरोग्य सेविका, चालक यांचा सत्कार, वृक्षारोपण ,वृक्ष संवर्धन, विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्याने, असे एकूण ३१ सेवाकार्यांचे प्रकल्प सातत्याने राबविले जात असून यापुढे ही सेवा प्रकल्प राबविले जातील .असे क्लबचे अध्यक्ष लॉ. नरेंद्र मोदी यांनी सांगितले. सुत्रसंचालन लॉ.अशोक हुरगट व लॉ. पवन सेठीया यांनी केले. तर लॉ. अशोक मिश्रा यांनी आभार मानले.

यावेळी लॉ.ज्ञानदेव पायगव्हाणे, लॉ. लक्ष्मीकांत कंकाळ, लॉ.राजेश कामड, लॉ. रामकुँवर अग्रवाल,लॉ.अरूण मित्तल, लॉ. अतुल लड्ढा, लॉ. शाम लोया,लॉ.सुनील बियाणी, लॉ. राधेश्याम टिबडेवाल, लॉ. सुशील पाण्डेय, लॉ. गेंदालाल झुंगे,लॉ.राजेश लूणिया, लॉ. किशोर गुप्ता, लॉ. रामदेव श्रोत्रिय, लॉ.महेंद्र पित्ती,लॉ. प्रा. मानधना,लॉ.राम उपाध्याय, लॉ. डॉ.केदार करवा,लॉ.राधेशाम जैस्वाल, लॉ.मनोज कर्नावट, लॉ.अमित चांडक, लॉ.मिनाक्षी दाड, लॉ. जयश्री लड्ढा, लॉ. सुषमा पायगव्हाणे, लॉ. आशा बगडिया, लॉ. सौ. गुप्ता,लॉ.सौ. कर्नावट,,लॉ.सौ.चांडक, आदींची उपस्थिती होती. पुरस्कार मिळाल्याबद्दल पदाधिकारी व सदस्यांनी लॉ. नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन केले.

# दागिन्यांसाठी नातवांनीच आजीचा काटा काढला, पोलिसांनी ३६ तासांत दोघांना ठोकल्या बेड्या

जालना दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- दागिन्यांसाठी नातवांनीच आजीची हत्या केल्याची खळबळजनक घटना जालन्यात घडली. याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही नातवांना बेड्या ठोकल्या आहेत. केशराबाई गंगाधर ढाकणे(६५) असे मयत महिलेचे नाव आहे. सदर गुन्ह्याचा सखोल तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय आहिरे आणि त्यांचे सहकारी करीत आहेत.

जालन्यातील भोकरदन तालुक्यातील हसनाबाद पोलीस ठाणे अंतर्गत चांदई एक्को या गावात २९ एप्रिल रोजी ही घटना उघडकीस आली. सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास चांदई एक्को शेत शिवारात घरासमोर केशराबाई मृतावस्थेत आढळल्या. त्यांच्या कानातून आणि नाकातून रक्त येत होते. महिलेचे कान तुटलेले होते. महिलेच्या अंगावरील दागिने गायब होते.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. शवविच्छेदन अहवालात गळा आवळून महिलेची हत्या केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी केशराबाई यांचा मुलगा राजू ढाकणे यांच्या फिर्यादीवरून हसनाबाद पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी तपास सुरू केला असता महिलेचा सख्खा आणि चुलत दोघे नातू हत्येवेळी घटनास्थळी होते. त्यानंतर ते फरार झाल्याचे समजले. आजीच्या अंतसंस्काराला नातू हजर राहिले नसल्याने पोलिसांचा त्यांच्यावरील संशय बळावला. पोलिसांनी दोघा नातवांचा कसून शोध घेत त्यांना मध्य प्रदेश बॉर्डरवरून ताब्यात घेतले. त्यांच्याकडील दागिने ताब्यात घेत त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.





यानंतर दोघांविरोधात गुन्हा दाखल करत त्यांना अटक करण्यात आली.

# पटाया येथील भव्य विश्वशांती रॅलीत जालन्यातील सेवाभावींचा सहभाग

जालना दि.३ (ग्लोबल भारत न्युज नेटवर्क)- प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्यावतीने दि. १ मे रोजी थायलंडमधील पटाया (थायलंड) येथे काढण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय शांती रॅलीत जगभरातून विविध देशांतील सेवाभावी सहभागी झाले. जालना येथून चार सेवाभावींनी सहभाग नोंदविला. जगात शांती, सद्भाव आणि आध्यात्मिक जागृतीचा संदेश पसरवणे हे या दिव्य शांती रॅलीचे उद्दिष्ट होते.या शांती रॅलीत भारताच्या विविध भागांतून ५०० तर महाराष्ट्रातून २५ सेवाभावी सहभागी झाले होते. बुऱ्हानपूर झोनमधून मंगला दीदी, कल्याण झोनमधून अलका दीदी यांनी रॅलीचे नेतृत्व केले. अकोला येथील रुक्मिणी दीदी, जालना शहरातून माजी नगराध्यक्ष सौ. कल्पना लाहोटी, सुनील लाहोटी, लक्ष्मीनारायण मानधना सौ. आशा मानधना, मध्यप्रदेशातील इंदौर येथून सुभाष माळी व मनोज गर्ग यांनी सहभाग नोंदविला. या रॅलीतील सहभागी सेवाभावींचे पटाया येथील मीरा दीदी व त्यांच्या सेवाभावी परिवाराने अत्यंत आत्मीयतेने स्वागत केले.

पटाया येथील समुद्रकिनाऱ्यावर इव्हिनिंग वॉकसाठी देश-विदेशातील लाखो पर्यटक येतात. त्या अनुषंगाने या बीचवर शांती रॅली काढण्यात येऊन जागतिक शांततेचा संदेश देण्यात आला.

विविध आध्यात्मिक सत्रे, ध्यानधारणा, सांस्कृतिक कार्यक्रम व जागतिक शांततेबाबतच्या चर्चांमधून ही रॅली अत्यंत प्रेरणादायी ठरली. सहभागी सेवाभावींच्या अनुभवाने, भक्तिभावाने व सेवेच्या निष्ठेने या रॅलीला एक आध्यात्मिक उंची प्राप्त झाली, असे सुनील लाहोटी यांनी सांगितले. या रॅलीच्या माध्यमातून मिळालेला शांतीचा संदेश सर्व सेवाभावी त्यांच्या- त्यांच्या क्षेत्रात पोहोचवतील, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.

# या आठवड्यात एण्ड टीव्हीवर प्रेक्षकांसाठी काय आहे खास?

**भीमा –** आश्रमात तणाव वाढतो कारण रागाच्या भरात कैलाश बुआ (नीता मोहिंद्रा) हलवा गोड प्रसाद म्हणून नव्हे तर परंपरेने वेढलेले शस्त्र म्हणून तयार करते. खोटे प्रेम दाखवत ती मीराला (आयुषी जैन) विषारी हलवा खायला घालते, जी हलवा खाताच जमिनीवर पडते. अशुभ बदल जाणवत भीमा (तेजस्विनी सिंग) आत येते. कैलाशाचे खरे हेतू उघडकीस येताच समेटाचा क्षण धक्कादायक विश्वासघातात बदलतो. न घाबरता भीमा शांतपणे कैलाशाचा सामना करतो. आश्रमातील रेशनच्या साहित्याची चोरी उघडकीस आल्यावर भीमा न्यायाची मागणी करण्यासाठी ठामपणे उभी राहते. एका गरीब महिलेच्या हताश विनंतीमुळे अखेर शांतता मोडते, ज्यामुळे कैलाशाला चोरीला गेलेले धान्य परत करण्यास भाग पाडले जाते आणि एकेकाळी घाबरलेल्या मातृसत्ताकाला नम्रपणे शिक्षा होते. डॉ. आंबेडकरांच्या (अथर्व) आदर्शांनी प्रेरित होत भीमा जातीभेदांच्या पलीकडे जाऊन असुरक्षितांना मदत करते आणि स्वतःच्या कुटुंबाच्या उदासीनतेला आव्हान देते. तिच्या पालकांनी अभिमानाने तिच्या शांतमय करूण वृत्तीला पाहिलेले असते, पण आता हीच वृत्ती बदलाच्या चळवळीत रूपांतरित होते. पण कैलाशा बुआ पराभूत झालेली नाही. आपली सत्ता जात असल्याचे जाणवत तिला भीमाची वाढती सहानुभूती थेट धोका म्हणून दिसते. विशंभर (विक्रम द्विवेदी) आणि धनिया (स्मिता साबळे) यांच्यासोबत भीमा उपोषण करते, त्यांच्या वडिलांच्या प्रतिष्ठेचा सन्मान करण्यासाठी गावात एकत्र येते. भीमाची चळवळ पुढे जाते तसतसे बाबासाहेब भीमाला इशारा देतात की न्यायाचा मार्ग अधिकच तीव्र होत जाईल. क्रूर प्रतिहल्ला करत कैलाशा भीमाला आयुष्यभर गुलामगिरीची शपथ घेण्याची मागणी करते. भीमा शिक्षणाची तिची स्वप्ने सोडण्यास नकार देते तेव्हा हृदयद्रावक फूट गावाला हादरवून टाकते. भीमाची शांतमय ताकद टिकेल का, की कैलाशाची परंपरेवरील पकड गावाला विभक्त करेल?

**हप्पू की उलटन पलटन –** मालिका हप्पू की उलटन पलटनचे आगामी एपिसोड्स हसवून-हसवून लोटपोट करतील. हप्पू सिंग (योगेश त्रिपाठी) विलक्षण व प्रेमळ स्थितीमध्ये अडकतो. अवधेशिया (उर्मिला शर्मा) राजेशला (गीतांजली मिश्रा) धूर्तपणे टोमणे मारते आणि विचारते की हप्पू कुटुंबातील इतर पुरुषांप्रमाणे स्वयंपाक का करू शकत नाही. या टोमण्याने दुखावलेली राजेश हप्पूला त्याचे स्वयंपाक कौशल्य दाखवण्याचे आव्हान देते. स्वतःला सिद्ध करण्याचा दृढनिश्चय केलेला हप्पू अभिमानाने कुटुंबासाठी चहा बनवतो. पण, परिस्थिती लाजिरवाणी होते, जेथे सर्वजण त्याच्या वाईट चहाची थट्टा करतात, ज्यामुळे हप्पूचा आत्मविश्वास कमी होतो; पोलिस स्टेशनमध्ये चिडलेला हप्पू मनोहरवर (नितीन जाधव) एका छोट्याशा चुकीबद्दल जोरदार टीका करतो. फटकारण्यापासून वाचण्यासाठी मनोहर हुशारीने हप्पूला होममेड बर्फी देतो. बर्फीचा आस्वाद घेताच हप्पू स्वादिष्ट चवीमध्ये भारावून जातो. हप्पू त्याच्याकडे किलोभर बर्फीची मागणी करतो. दरम्यान, शाळेमध्ये एक हुशार विद्यार्थी मास्टरला तीच बर्फी देतो आणि अपमान होण्यापासून स्वतःचा बचाव करतो, तसेच हप्पूला देखील प्रेरित करतो. घरामध्ये स्वतःचा मान पुन्हा मिळवण्याचा निश्चय करत हप्पू काहीतरी स्वादिष्ट करण्याचे ठरवतो, पण त्याची एकच मागणी असते: कोणीही त्यामध्ये त्रास देऊ नये. हप्पू आणखी बर्फी मिळण्यासाठी मनोहरची वाट पाहत असताना खोदीसोबत (शरद व्यास) झालेल्या भांडणामुळे रागावलेली कटोरी अम्मा (हिमानी शिवपुरी) घर सोडण्यापूर्वी किचनमध्ये जाते. शेवटी, मनोहर बर्फी घेऊन येतो आणि हप्पू अभिमानाने त्याच्या कुटुंबियांना बर्फी देतो. सर्वांसह अवधेशिया देखील त्याचे कौतुक करू लागते. भारावून गेलेली अवधेशिया हप्पूकडे तिच्या भेट देणाऱ्या मैत्रिणींसाठी बर्फी तयार करण्याचा आग्रह करते. हप्पू मान्य करतो, पण नवीन समस्या येते. मनोहर हरवतो. शोध घेतल्यानंतर हप्पू घरी परत येतो, जेथे त्याला मनोहर कटोरी अम्माच्या खाटेखाली लपलेला दिसतो. हप्पू पोलिस स्टेशनमध्ये मनोहरची चौकशी करू लागतो, शेवटी मनोहर आणखी बर्फी बनवण्याचे मान्य करतो. पण बर्फी घेऊन घरी परतत असताना हप्पूला बेशुद्ध अवस्थेत दबंग (स्थानिक गुंड) पाहायला मिळतो. हप्पू त्याला बर्फी खायला देऊन शुद्धीवर आणतो. गुंड बर्फीला जीवन बदलणारा शोध म्हणतो तेव्हा हप्पू आश्चर्यचकित होतो. शाळेमध्ये मुले देखील मास्टरचे मन जिंकण्यासाठी बर्फीचा वापर करतात आणि मास्टरला बर्फी खूप आवडते. हप्पू व त्याचा मित्र बेनी (विश्वनाथ चॅटर्जी) मद्यपान करून घरी परतत असताना मोठी समस्या उद्भवते, हप्पूचे अपहरण होते. बंदिवासात असताना दबंग हप्पूला दोन पर्याय देतो: त्याच्या कूकला बर्फीची पाककला शिकवावी किंवा तेथेच राहून कायमस्वरूपी बर्फी बनवत राहावे. दबावाखाली हप्पू बर्फी बनवतो, पण बर्फी खाताच गुंड बेशुद्ध होतो, ज्यामुळे हप्पूला तेथून पळून जाण्याची संधी मिळते. हप्पूचे सिक्रेट अखेर सर्वांसमोर उघडकीस येईल का?

**भाबीजी घर पर है –** अम्मा (सोमा राठोड) तिवारीला (रोहिताश्व गौड) सल्ला देते की, त्याच्या पत्नीला आनंदी ठेवण्यास पालकत्वाच्या प्रवासामध्ये मदत होऊ शकते. अम्माचा सल्ला गांभीर्याने घेत तिवारी अंगूरीला (शुभांगी अत्रे) आनंदित ठेवण्यास सज्ज होतो. घराबाहेर तिवारी वृद्ध माणसाला भेटतो, जो कुशल स्वीट मेकर असतो आणि तिवारीला स्पेशल मिठाई गरगुंडा देतो. मिठाईचा आस्वाद घेताच तिवारी भारावून जातो. आनंदित होत तो त्वरित अंगूरीसाठी काही मिठाई घेऊन जातो. गरगुंडाचा आस्वाद घेताच अंगूरी देखील आनंदाने अचंबित होते. मिठाईचा जादुई प्रभाव पाहून तिवारी अनिताला (विदिशा श्रीवास्तव) देखील मिठाई देतो. गप्पागोष्टी करताना अनिता तिवारीला गरगुंडाची विक्री करण्याचा सल्ला देते. वेळ वाया न घालवता तिवारी टीएमटी (टीका, मल्खान, टिल्लू), प्रेम मास्टर, डॉक्टर आणि मोहल्ल्यामधील इतर रहिवाशांना उरलेली गरगुंडा मिठाई विकण्यास सुरूवात करतो. सर्वांना मिठाई खूप आवडते आणि गरगुंडाची मागणी खूप वाढते!

पहा मालिका भीमा रात्री ८.३० वाजता, हप्पू की उलटन पलटन रात्री १० वाजता आणि भाबीजी घर पर है रात्री १०.३० वाजता दर सोमवार ते शुक्रवार फक्त एण्ड टीव्हीवर!







# ‘वागले की दुनिया’ मालिकेत राजेश वागले दिसणार वेंकट स्वामी राजूच्या रूपात!

सोनी सबवरील ‘वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से’ मालिका त्यातील संबद्ध वाटणारा मध्यमवर्गीय संघर्ष आणि हृदयस्पर्शी कौटुंबिक क्षण यामुळे लोकांची आवडती मालिका झाली आहे. अलीकडच्या भागांमध्ये, कियारा (अंजू जाधव) आपल्या ‘ड्रीम मॅन’चे सर्जन करण्यांसाठी एआय ॲप च्या मदतीने प्रयत्न करते. जेव्हा ते ॲप राजेश वागलेचा (सुमित राघवन) चेहरा जनरेट करते, तेव्हा तिला धक्काच बसतो. ती शांतपणे ती इमेज सेव्ह करून ठेवते आणि राजेशला नकळत ती दिसते आणि त्याच्या मनात संदेह आणि भीती येते. मग काही गंमतीशीर गोष्टी घडतात. कियाराला कामकाजाच्या वेळेत राजेश अचानक एका कॅफेमध्ये दिसतो. आपण पाहिलेला हा माणूस राजेश सारखाच दिसणारा एक तामिळ वेंकट स्वामी राजू होता अशी ती बतावणी करते.



आगामी भागांमध्ये, दक्कू (दीपक पारीक) राजेशला बेमालूम लकबी आणि उत्तम वेषभूशेसह तोतया ‘वेंकट’चे रूप घेण्यास मदत करतो. पण कियारा वंदनाला (परिवा प्रणती) विश्वासात घेऊन सगळे सांगते, तेव्हा आणखीनच गोंधळ माजतो. ती वंदनाला सांगते की, ती पूर्वी राजेशला आपला आदर्श जोडीदार मानत असे, पण आता तिला वाटते काहे की वेंकट तिचा खरा जोडीदार आहे. सत्य माहीत नसल्यामुळे ती वेंकटला मागणी घालण्याचे देखील ठरवते. जेव्हा वंदना या रहस्यमय तोतयाला बघण्याची इच्छा व्यक्त करते आणि त्याला वागले कुटुंबाला भेटण्यासाठी आपल्या घरी बोलावते, तेव्हा गुंता आणखीनच वाढतो.

हा गुंता राजेश कसा सोडवेल? तो एकाच वेळी राजेश आणि राजू बनू शकेल का? कारण दोघांनी एका वेळेस हजर राहणे अपेक्षित आहे. आगामी भागांमध्ये भरपूर धमाल, भन्नाट घटनाक्रम, ओळखीतील गफलत, गोंधळ आणि थेट वागले-शैलीचा विनोद बघायला मिळेल.

राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, “खरं सांगतो, हे वेंकट स्वामी राजू कथानक भलतेच धमाल होते! कल्पना करा, एरवी अगदी नीटनेटका, व्यवस्थित असलेला राजेश तामिळ असल्याचे नाटक करत आहे. अनेक लोकांना हे माहीत नसेल पण मी प्रत्यक्ष जीवनात तमिळच आहे. त्यामुळे वेंकट स्वामी राजूच्या भूमिकेत शिरणे माझ्यासाठी सोपे, जुन्या आठवणींचा आनंद देणारे आणि रंजक होते. राजेश हा खोटेपणा टिकवून ठेवण्याचा आटापिटा करत आहे, पण इतर सगळ्या गोष्टी हाताबाहेर गेल्या आहेत. थोडक्यात एक भन्नाट वागले गोंधळ माजणार आहे. आणि मला वाटते, ही गोष्ट उलगडताना बघताना प्रेक्षकांना आणि खास करून कुटुंबांना खूप मजा येईल.”

बघत रहा, ‘वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से’ सोनी सबवर दर सोमवार ते शनिवार रात्री ९:३० वाजता

# ‘तेनाली रामा’ मालिकेत दिसणार कुणाल करण कपूर

सोनी सबवरील तेनाली रामा मालिकेत कृष्ण भारद्वाजने साकारलेल्या तेनाली या दरबारी कवी आणि मुत्सद्दी रणनीतीकर्त्याच्या सुरस रम्य कथा पाहताना प्रेक्षक गुंग झाले आहेत. विनोद, बुद्धीचातुर्य आणि सुजाणता यांचे मिश्रण करून सादर करणारी ही मालिका आता एक नवीन वेधक वळण घेत आहे. अभिनेता कुणाल करण कपूर लक्ष्मणप्पा भट्टारू म्हणजे लक्ष्मणच्या रूपात मालिकेत दाखल होत आहे. माजी लष्करी डॉक्टर आणि आता गुप्तहेर झालेल्या लक्ष्मणच्या एंट्रीमुळे मालिकेत वेगवेगळे तरंग उठताना दिसतील.

लक्ष्मण इमानदार, विवेकी आणि अत्यंत बुद्धिमान आहे. सगळ्या गोष्टी तो विज्ञानाच्या कसोटीवर तपासून घेतो ज्ञान, सत्य आणि न्यायाचा शोध घेण्यासाठी त्यांचे हिंसेचे जीवन मागे टाकले आहे. रामाच्या जगात त्याचा प्रवेश एका आगळ्यावेगळ्या तळपत्या भागीदारीची सुरुवात दर्शवितो. ही अशी भागीदारी आहे, ज्यात बुद्धी आणि शारीरिक सामर्थ्य दोन्हीची आवश्यकता आहे. तेनाली रामा जर राज्यातील सर्वात चाणाक्ष माणूस असेल तर लक्ष्मण तर्कनिष्ठ आहे. रामाचा तेजस्वीपणा तो शांत व्यावहारिकतेने सौम्य करतो आणि कित्येकदा अटीतटीच्या परिस्थितीत अनपेक्षितपणे नायक बनून जातो. लक्ष्मणकडे जीवशास्त्रीय विचार आहे, वैद्यकीय नैपुण्य आहे तसेच तलवार चलवण्याचे कसब आणि व्यावहारिक युक्त्या देखील आहेत. तो एक परिपूर्ण पॅकेज आहे. रामाशी त्याचे नाते घनिष्ठ आहे, कधी कधी ते विचारसरणीच्या संघर्षात परिणत होते. अशाप्रकारे लक्ष्मणच्या एंट्रीमुळे मालिकेला नवीन गहनता आणि नाट्यमयता मिळाली आहे.

तेनाली रामा मालिकेत लक्ष्मणप्पा भट्टारूची भूमिका करणारा कुणाल करण कपूर म्हणतो, “लक्ष्मण ही व्यक्तिरेखा मी या आधी साकारलेल्या भूमिकांपेक्षा खूप वेगळी आहे. त्याच्यात विविध स्तर आहेत, एक शक्तिशाली भूमिका आहे. तेनाली रामा मालिकेत दाखल होताना मी एक निवृत्त लष्करी डॉक्टर आहे, जो शांतीच्या शोधात निघाला आहे. पण अचानक तो एका थरारक साहसात ओढला जातो आणि एका लक्षवेधी अध्यायाची सुरुवात होते. सोनी सबशी माझे नाते दोन दशकांपासून आहे. प्रत्येक वेळी इथे परतताना असे वाटते की जणू अर्धे वाचून ठेवलेले पुस्तक पुन्हा हाती घेतले आहे. आणि या पुस्तकात अजून काही रोचक प्रकरणे वाचायची बाकी आहेत. व्यक्तिशः माझ्या प्रवासात, मी पहिल्यांदाच ऐतिहासिक मालिका आणि कॉस्च्युम शो करत आहे. इतका वेगळा पोशाख करणे हे आव्हानात्मक होऊ शकते. पण इकडच्या टीमने लुकबाबत उत्तम कामगिरी केली आहे. ही भूमिका मी स्वीकारली याचा मला आनंद वाटतो. मला सेटवरचा माझा पहिला दिवस आठवतो. मी आरशासमोर उभा होतो, पोशाखानुसार स्वतःला जुळवून घेण्याचा प्रयत्न करत होतो. आणि आपल्याला हे जमेल ना अशी शंका देखील मनात डोकावत होती. पण हळूहळू मी त्या व्यक्तिरेखेत शिरलो. आणि आता या पोषाखाशिवाय लक्ष्मणचा विचार करणे देखील अवघड आहे.”

बघा, ‘तेनाली रामा’ दर सोमवार ते शनिवार रात्री ८ वाजता फक्त सोनी सबवर



# विपिन हीरो: मालिका ‘भाबीजी घर पर है चे कलाकार मला मल्खानच्या भूमिकेत पाहून भावूक झाले!

मालिकेमध्ये मल्खानची भूमिका साकारताना आव्हानात्मक वाटले का?

मल्खानची भूमिका सोपी नाही, तो वारसा पुढे घेऊन जातो. पण माझ्या सह-कलाकारांच्या अविश्वसनीय पाठिंब्यामुळे हा प्रवास सोपा ठरत आहे. सर्वजण माझ्याशी आपुलकीने व संयमाने वागत आहेत, मला मल्खान बोलणाऱ्या त्याच्या पंचलाइन्सपासून त्याच्या खोडकर देहबोलीपर्यंत प्रत्येक बारकावे समजण्यास मदत करत आहेत. येथे सर्वजण कुटुंबासारखे वाटतात आणि त्यांच्या प्रोत्साहनाने मला भूमिकेमध्ये सामावून जाण्यास, तसेच भूमिकेमधील भावनिक महत्त्वाचा आदर करण्यास आत्मविश्वास दिला आहे.

भूमिकेमध्ये सामावून जाताना कसे वाटले?

मल्खान सिंगची भूमिका साकारणे माझ्यासाठी संधीपेक्षा भावना आहे. दीपेशने या भूमिकेसाठी बेंचमार्क निर्माण केला आणि त्याने साकारलेली भूमिका साकारण्याची संधी मिळणे नियतीमध्ये लिहिलेले होते असे वाटते, ज्यामुळे आमच्यामध्ये एक खास भावनिक नाते निर्माण झाले आहे. पहिल्याच दिवशी मी सेटवर मल्खानच्या पेहरावामध्ये आलो आणि सर्वत्र शांतता पसरली होती. मला भूमिकेबाबतच्या आठवणी जाणवू लागल्या. वैभव माथूर (टिका), सलिम झैदी (टिल्लू), रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी) आणि सोमा राठोड जी (अम्माजी) हे सर्व स्तब्ध झाले आणि त्यांच्या डोळ्यांमध्ये भावना दिसून आली. त्यांनी मला सांगितले की मी त्यांना माझ्या लुकमधून, तसेच ऊर्जा व उत्साहामधून त्याची आठवण करून दिली. तो क्षण उत्साहवर्धक व विनम्र होता. त्याच क्षणी मी स्वत:ला या भूमिकेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आणि दीपेशने निर्माण केलेला वारसा कायम ठेवण्याचे वचन दिले, तसेच त्याने निर्माण केलेल्या हास्याचा दर्जा कमी होणार नाही याची देखील मी खात्री घेणार आहे.

कलाकारांमध्ये सामील होण्यापूर्वी तुम्ही मालिका ‘भाबीजी घर पर हैशी किती वैयक्तिकरित्या संलग्न आहात?

माझे कुटुंब आणि मी अनेक वर्षांपासून मालिका ‘भाबीजी घर पर हैचे मोठे चाहते आहोत. आम्ही घरी दररोज मालिका पाहायचो, कधीच एकही एपिसोड पाहायला चुकलो नाही. म्हणून या मालिकेचा भाग बनणे स्वप्न पूर्ण झाल्यासारखे वाटते. व्यावसायिक स्तरावर हे यश असण्यासोबत माझ्यासाठी व माझ्या प्रियजनांसाठी अभिमानास्पद क्षण देखील आहे. सेटवर आल्यानंतर मला कृतज्ञता व जबाबदारी जाणवते.

तुम्ही गायक व लेखक देखील आहात. ही क्रिएटिव्ह पार्श्वभूमी तुम्हाला अभिनय प्रवासामध्ये कशाप्रकारे मदत करते?

संगीत, लेखन व अभिनय हे सर्व भावनांच्या अभिव्यक्ती आहेत. गायन व गीतरचनेमध्ये पार्श्वभूमी असल्याने मला भावना जाणून घेण्यास आणि वास्तविक रुपात अभिव्यक्त करण्यास मदत होते. यामुळे मला ताल व टाइमिंग साध्य करता येते, विशेषत: कॉमेडीमध्ये, जेथे बीट्स व पॉजेज खूप महत्त्वाचे आहेत. माझा विश्वास आहे की प्रत्येक कलाप्रकार एकमेकांशी जुडलेले आहेत, ज्यामधून तुम्ही सर्वोत्तम परफॉर्मर बनता.

कॉमडी सीन्स तुमचा कम्फर्ट झोन आहे असे वाटते. ते तुमच्या मनाशी इतके का जवळ आहेत याबाबत सांगू शकता का?

माझ्यासाठी कॉमेडी म्हणजे श्वास. यामध्ये मला उत्साही आणि प्रेक्षकांशी कनेक्टेड असल्यासारखे वाटते. व्यक्तींना हसवणे हा मोठा आशीर्वाद आहे आणि यामधून मला खूप समाधान मिळते. विशेषत: ‘भाबीजी घर पर है सारखी मालिका घराघरामध्ये आनंद पसरवत आहे. हे अत्यंत लाभप्रद वाटते. मल्खानची भूमिका साकारताना मला आवडणारी गोष्ट करण्याची सुरेख संधी मिळते, ती म्हणजे प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर आनंद आणणे.

तुम्हाला मल्खान सिंगच्या भूमिकेत पाहण्यास उत्सुक असलेल्या चाहत्यांसाठी एखादा विशेष संदेश?

मी तुम्ही केलेला प्रेमाचा वर्षाव व स्वीकृतीसाठी मनापासून तुमचे आभार व्यक्त करतो. कृपया मालिका ‘भाबीजी घर पर हैला दिलेल्या पाठिंब्याप्रमाणेच मला देखील पाठिंबा देत राहा. मी मल्खान सिंगच्या वारसाला सन्मानित करण्याचे आणि तुम्हाला आनंद, हास्य व हृदयस्पर्शी क्षणांचे मनोरंजन देण्याचे वचन देतो.

पहा विपन हीरो यांना मल्खानच्या भूमिकेत मालिका ‘भाबीजी घर पर हैमध्ये दर सोमवार ते शुक्रवार रात्री १०.३० वाजता फक्त एण्ड टीव्हीवर!



वृत्तपत्र क्षेत्रातील खणखणीत नाणं

# ग्लोबल भारत

संपादक – शरद खेमचंद अडागळे

## आपला जिल्हा, शहर, तालुक्यासह भागातील बातम्या नियमित वाचा 'ग्लोबल भारत'







**मनोरंजन, कृषी, आरोग्य, करिअर यासह विविध विषयावर आठवड्यातून एक दिवस परिपूर्ण माहिती....**

**✻ अधिक माहितीसाठी संपर्क ✻**

dailyglobalbharat@gmail.com
www.globalbharatlive.com